शनिवार । २३ फेब्रुवारी १९८० । ७५ पैसे

# माणूस

महागाईची झळ
काय फक्त
मध्यमवर्गीयांनाच
पोचते ?

पृष्ठ....२४




**विशेष वार्तालेख पुढील अंकी**

‘सर्वजनहिताय
सर्वजनसुखाय
हे आमच्या सरकारचे
उद्दिष्ट आहे.

‘हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी
आम्ही संघर्षाऐवजी
सहकार्याचा
मार्ग स्वीकारू.

‘म्हणून मी हे असे आश्वासन
देते की, विरोधकांबाबत आम्ही
सूडबुद्धीने वागणार नाही.’

१४ जानेवारीला
आकाशवाणीवरून केलेल्या
भाषणात पंतप्रधान इंदिरा
गांधींनी देशाला दिलेले
हे आश्वासन.

**पण**

मंत्रिमंडळाच्या शपथविधी-
पासून १७ फेब्रुवारीला
झालेल्या ९ विधानसभांच्या
विसर्जनापर्यंत प्रत्यक्षात काय
घडले ?

## इंदिरा-संजय राजवटीचे पहिले पस्तीस दिवस

# मोलकरणींच्या संपाच्या निमित्ताने !

'मोलकरीण ! '

हजारो, लाखो घरातल्या लख्ख भाड्यामागचं आणि कपड्यां-मागचं जिवंत, चालतं-बोलतं रहस्य ! सकाळपासून संध्याकाळपर्यंत मिनिटामिनिटाशी तारेवरची कसरत करत हजारो स्त्रिया 'मोल-करीण' म्हणून जगत आहेत. मालकीण देईल तो पगार आणि तिच्या घरचं शिळं-पाकं यावर काम करीत असतात. सूर्योदयापूर्वी बराच काळ आधी तिचा दिवस उगवतो आणि रात्री ११/१२ ला तिचा सूर्य मावळतो ! तिला महागाई आहे, भूक आहे, भावना आहेत, दारू पिणाऱ्या नवऱ्यामुळं मानसिक ताण आहेत, हे सर्व बरोबर घेऊन ती जगत असते, हसत असते. मताच्या वेळेला पांढरं हसू पांघरून लोक तिच्या दारात येतात. पुन्हा दुसऱ्या निवडणुकी-पर्यंत कोणीच तिचा विचार करीत नाही. गोदावरीबाई आणि शाम-राव परुळेकरांनी पहिल्यांदा मोलकरणींना, मुंबईतल्या रामागड्याला संघटित केलं. पुण्यात १०–१५ वर्षांपूर्वी मोलकरणींनी संप केला होता; पण १०–१५ वर्षात चतकोर जमिनीच्या तुकड्याची किंमत वाढलीय, महागाई वाढलीय. गेले १०–१५ वर्षं या बाया मुकाटपणे खाली मान घालून भांडी घासत होत्या – आलेला वैताग कदाचित धुणं जोरात आपटून व्यक्त करीत होत्या. १० फेब्रुवारीपासून संप करून, उत्स्फूर्त संप करून तिच्या स्वत:च्याच मुकाट चित्रावर तिने एक तडा मारला !

दि. १० फेब्रुवारीला संपाला प्रभातरोड, कर्वेरोड भागात सुरुवात झाली. १ तारखेपासूनच संपावर जाणार असं 'मोलकरणी' बोलत होत्या. ९ तारखेला काही जणी संपावर होत्याच. ९ ला त्या भागातल्या मोलकरणींनी सर्वांना संपाबद्दल सांगून संपाची तयारी केली. १० ला प्रभातरोड, कर्वेरोड, एरंडवणा, गणेशनगर, पौड-फाटा भागातली कामं बंद राहिली. सकाळी आणि दुपारी मोर्चा निघाला. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात ही बातमी आली आणि मग पुण्यात हा संप चांगलाच पसरला. किमान ५ ते १० रु. पगारवाढ, महिन्यातून दोन सुट्ट्या, वर्षाला १ महिन्याचा पगार वा एक साडी बक्षीस म्हणून, आजारपणाची रजा कापू नये या मागण्यावर सुमारे २ हजार मोलकरणी संपावर गेल्या. १०००० कुटुंबाना हा संप जाणवला. ४।४ दिवस संप चालू राहून बऱ्याच जणींना पगारवाढ मिळाली आहे. संप ज्या भागांत पसरत होता तेथे त्या भागातील मोलकरणींचा मोर्चा निघे ! मुलाबाळांसकट त्या मोर्चात सहभागी होत. नगरसेवक खिलारेंनी या प्रश्नात बरेच लक्ष घातले. सर्व श्रमिक संघ, राष्ट्रीय समता संघाच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. खिलारेंच्या घरच्या गॅलरीत दररोज रात्री सभा चालत. रात्री १० ते १ पर्यंत. जवळजवळ सर्वांना पगारवाढ मिळाली आहे. सुट्टयाही मिळाल्या आहेत ! मोलकरणींची संघटना स्थापन झाली आहे. काही जणींना संपाच्या पहिल्या दिवशीच मागण्या मान्य असल्याचे मालकिणींनी सांगितले, तरी आपल्या मैत्रिणींना पाठिंबा म्हणून त्यांनी ३।३ दिवस संप केला. त्या मोर्चाला आल्या. संपावर गेल्या म्हणून मालकिणींची बोलणी उलट वाढली आहेत. तणतण करत का होईना पण पगारवाढ मान्य झाली आहे. आम्ही पगारवाढ देऊ अशा चिठ्ठ्या मोलकरणींबरोबर येऊ लागल्या आहेत. शहराच्या काही भागात संप अद्याप चालू आहे. (दि. १६ फेब्रुवारीपासून) काही ठिकाणी कामावरून काढून टाकण्याचे प्रकार घडले; पण त्यावरही संघटित कृति करण्याचा मोलकरणींचा विचार आहेच ! मोलकर-णींच्या मागण्या अतिशय न्याय्य आहेत. वाढत्या महागाईची झळ तिलाही पोहोचत आहे.

पुण्यापुरतं बोलायचं झालं तर धुणी–भांडी करणाऱ्यांच्या या व्यवसायात स्त्रियाच आहेत. कँपमधील काही अपवाद वगळता पुरुष जवळजवळ घरकाम या व्यवसायात नाहीतच. मुंबईमध्ये मात्र पुरुष या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर आहेत. रोजगार शोधण्यासाठी अनेक कुटुंबे पुण्याच्या आसपासच्या खेड्यांतून, तसेच महाराष्ट्रातल्या दुष्काळी भागातून आली आहेत. शेतीची पार्श्वभूमी असलेल्या कुटु-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे

अंक : एकूणचाळीसावा

२३ फेब्रुवारी १९८०

किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

बातील स्त्रिया धुणीभाड्याच्या व्यवसायात मोठ्या संख्येने शिरतात. कारण कसलेही शिक्षण नाही आणि दुसरा व्यवसायच कोणताही उपलब्ध नाही. ब्राह्मणजातीतील शिक्षण नसलेली, निराधार, बेकार स्त्री पोळ्या लाटणे किंवा स्वयंपाक करण्याकडे वळते तर ब्राह्मणेतर जातीतील स्त्रिया धुणीभाडी, झाडू मारणे व अन्य घरकाम करू लागतात. पुण्यातील कँप परिरात अस्पृश्य जातीतील स्त्रिया मोठ्या प्रमाणावर घरकाम या व्यवसायात आहेत. पण 'ब्राह्मणी' पुण्यामध्ये मात्र अस्पृश्य जातीतील स्त्रिया अत्यल्प आहेत. पूर्वी निराधार किंवा विधवा स्त्रिया या व्यवसायात जास्त असत अलीकडे तरुण विवाहित स्त्रिया, मुली, अविवाहित तरुणीही इकडे वळू लागल्या आहेत.

बहुतेक सर्वजणींच्या घरी नवरा किंवा वडील दारू पिणारे आहेतच. कुटुंबामध्ये नोकरदार मंडळी अपवादात्मक परिस्थितीत सापडतात. असली तरी प्यून किंवा तत्सम दर्जाच्या नोकरीतच. कुटुंबाचे उत्पन्न अर्थातच अतिशय कमी आहे. शिक्षण मोफत असून किंवा फीची सवलत मिळत असूनही मुलांना ३, ४ थी पर्यंतच शिक्षण देऊ शकणाऱ्या स्त्रियाही संपात भेटल्या. मुलींना शिक्षण तर दुर्लभच होते शाळा सकाळची असेल तर थोड्याफार इयत्ता तरी जमतात. आईला 'जरा हात लावायला' नाही तर घराकडे बघण्यासाठी म्हणून शाळेत जायला मिळत नाही.

घरकाम करणाऱ्या स्त्रियांची साधारणपणे दोन गटात विभागणी करता येईल. १) दिवसभर राहून घर सांभाळून 'वरच्या-कामा'-सकट म्हणजे दळण, अंथरूण-पांघरूण काढणे, घर झाडणे, फरशी पुसणे, लहान मुले असतील तर शाळेत पोहचवणे, सामान आणणे, घरातील पडेल ते काम करणे – स्वयंपाक करणे. काही ठिकाणी हीच स्त्री कपडे धुणे व भाड्यांचेही काम बघते. २) फक्त धुणी-भाडी करणे, किंवा धुणीभाडी व बोलीचे काम म्हणजे झाडू मारणे, घर पुसणे, दळण, मुले पोहचवणे, दूध आणणे, केराची बादली टाकणे इत्यादि.

## झोपडीचे भाडे ३० रु. प्राप्ती ७० रु.

१० फेब्रुवारीपासून झालेल्या संपामध्ये मोठ्या संख्येने सहभागी आहेत त्या दुसऱ्या गटातल्या स्त्रिया. या स्त्रिया ज्या परिस्थितीत काम करतात ती पुढे येईलच. पगार मात्र अतिशय अपुरे आहेत. २ माणसांच्या कुटुंबाची धुणीभाडी करायची तर दहा रु. मिळतात; ४–५ माणसांचे कुटुंब असेल तर २०–२५ रु. मिळतात. लक्ष्मीपार्क कॉलनीतील एका घरात १५ माणसांचे कुटुंब आहे. या कुटुंबाची भाडी आणि धुणे धुणाऱ्या आजीबाईंना पगार फक्त २५ रु. आहे. जवळजवळ सर्व बाया किमान ३ – ४ ठिकाणी काम करतात. महिन्याला ६० रु. पेक्षा जास्त मिळकत होत नाही. दिवसेदिवस महागाई वाढतच चालली आहे. कोथरूड भागातील एका बाईंना झोपडीचे भाडे ३० रु. आहे. मिळतात मात्र ७० रु महिना.

सकाळी ७ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत काम असतेच. दिवसात १० तास काम करूनही त्यामानाने पैसे जास्त मिळत नाहीत. त्याचबरोबर बऱ्याच ठिकाणी तिला वागणूकही चागली मिळत नाही. घरातली मालकीण तर बोलतेच; पण चिमुरड्या पोरीचीही बोलणी साध्या साध्या कारणावरून खावी लागतात. मोलकरणी उद्दाम, बेरकी, कामचुकार, चोरट्या, आगाऊ असतात असाच बहुतेकांचा समज असतो. अपवादात्मक घरमालकिणी तिला चागले वागवतात, तिच्याकडे माणूस या दृष्टिकोनातून बघतात. धरणामुळे उठवलेल्या गावाचे पुनर्वसन होऊन गाव सुधारले तरी त्या गावांचा महारवाडा पुन्हा गावाबाहेरच राहतो तशीच परिस्थिती धुणी, भांडी करण्याच्या सार्वजनिक जागेबद्दल आहे. शहरातील जुन्या वाड्यामध्ये, वाड्याच्या रचनेमुळे आत ऊन येतेच असे नाही. त्यामुळे काही ठिकाणी उघडी मोरी असेल तर सावली असते, पण पावसाळ्यात भिजतच काम करावे लागते. नव्या ओनरशीप सोसायटयांच्या बिल्डिंग्ज वाढत आहेत. कमीत कमी जागेमध्ये जास्तीत जास्त फ्लॅटस् काढण्याचा प्रयत्न प्रमोटर्स करीत असतात. अशा सोसायट्यामध्ये धुण्याभाड्याची सार्वजनिक मोरी असते; पण अनेक ठिकाणी या मोरीवर पत्रा नसतो. याची नोंद बिल्डिंगला परवानगी देताना घेतली जात नाही. उन्हात आणि पावसात भाजत आणि भिजत या बाया काम सरतात. सर्वत्र या मोरीची जागा अतिशय अपुरी असते. सकाळी घाईच्या वेळात ३।४ जणी भाडी घासत असतात. मालकीणीलाही घाई असते. जवळजवळ भाडी घासल्याने भाड्यांची अदलाबदल होते. कधी एकीचे भाडे दुसरीकडे जाते मालकीणबाईच्या लक्षात आल्यावर त्या जाब विचारतात. काही वेळा जिच्याकडे भाडे गेले असते ती शेजारीण ते आणून देते; पण दिले नाही की मोलकरीणच चोर ठरते. वास्तविक भांडे जवळपासच्या ब्लॉकमध्ये असते. ती मालकीण चोर ठरत नाही. पैसे मात्र कापले जातात ते मोलकरणीचे. शिवाय भांडं गेलं म्हणून अनेक दिवस मालकीणीची तणतण ऐकावी लागते. यामध्ये मोरी ऐसपैस करावी असे मात्र कोणाच्याच मनात येत नाही. या संपामध्ये मोलकरणीना पगारवाढ नाकारताना त्या भाडी हरवतात अशी तक्रार होती, आणि म्हणून पगारवाढ द्यायला नकार दिला गेला. पण भाडी हरवतात याला जबाबदार मोलकरीण नसून अपुरी जागा आहे हे मात्र कोणी लक्षात घेतलेले नाही.

'आम्ही एवढा पगार देतो, पण भांडी स्वच्छ निघत नाहीत. मग पैशाचं चीज ते काय?' असाही प्रश्न विचारून पगारवाढ नाकाणाऱ्या काही होत्या. सकाळच्या काय किंवा दुपारच्या वेळी सर्वच मोलकरणींची वेळ एक येते. नळ एकच असतो. सकाळी मालकिणीला भाडी लवकर हवी असतात, पुन्हा पाणी गेले तर? त्यामुळे घाईत भाडी घासली जातात. एकाच ठिकाणी ३।४ नळ असले तर तेवढीही घाई होणार नाही! काही ठिकाणी २४ तास पाणी नसते. अशा ठिकाणी दिलेल्या पाण्यातच भाडी करावी लागतात आणि स्वच्छ निघत नाहीत म्हणून आरडाओरडा होतो. मोलकरीण हे एक यंत्र आहे असाच समज आहे!

सतत पाण्यातली कामे केल्याने त्याचा आरोग्यावर अनिष्ट परिणाम होत असतो. मग अंग भरून येते, कसकसून येते, गुडघे तर हमखास दुखत असतात. बाळंतपणात शेकशेगडी मिळालेली नसतेच. सर्दी तर शरीरात कायमची ठाण मांडून बसलेली असते. बाहेरचे काम आणि घरकाम असा दुहेरी बोजा असतोच. ताण शरीरावर पडत असतोच.

पृष्ठ २३ वर

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

## या ग्रहणात माणूस या प्राण्याची वागणूकच अभ्यास करण्यासारखी होती

कुणी मला सांगेल का हे शतक कोणते आहे? हे विसावे. शतक का? की चौदावे–पंधरावे? माझा अतिशय गोंधळ झाला आहे.

आज ग्रहण आहे. आज महाप्रतापी सूर्यनारायणास चंद्र झाकणार आहे. महाकाव्याच्या भाषेत सांगावयाचे तर आज गाईच्या खुराच्या खळग्यात हत्ती बुडणार आहे. चिलट सागराचं प्राशन करणार आहे. ससा सिंहाला ठार मारणार आहे.

आज ग्रहण आहे. आज हवेतील प्राणवायू कमी होणार आहे. आज समुद्राच्या लाटा जमिनीवर येऊन थैमान घालणार आहेत. आज सूर्यापासून अत्यंत घातकी किरण बाहेर पडणार आहेत. आज सूर्याकडे बघणाऱ्या अनेकांचे डोळे जाणार आहेत.

आज ग्रहण आहे. आज राहू सूर्याला ग्रासणार आहे. ग्रहणात झोपले तर जरादिपीडा, मूत्रोत्सर्ग केला तर मूत्ररोग व दारिद्र्य, शौच केले तर कृमिरोग, अभ्यंग केले तर कुष्ठरोग, भोजन केले तर नरकप्राप्ती वगैरे फले मिळतात.

आज ग्रहण आहे. आज ग्रहणाचा विविध अंगांनी अभ्यास करण्यास देशोदेशीचे दीडशे-एक शास्त्रज्ञ सज्ज होऊन आहेत. खग्रास ग्रहणाच्या मार्गावर तंबू ठोकून ते उपकरणी घेऊन बसले आहेत. अनेक महत्त्वाची उपयुक्त माहिती हाती यावी असा अंदाज आहे.

आज ग्रहण आहे. आज पुण्यकाल आहे. ग्रहणात सर्व उदक गंगेसमान आहे; पण त्यातून वाहते उदक, सरोवर, नदी, महानदी, गंगा, समुद्र यांचे स्नान उत्तरोत्तर अधिक पुण्यकारक आहे.

ग्रहणाची ही काही शास्त्रीय, काही पंचांगातील फले दिली आहेत.

□

ग्रहणाचा स्पर्शकाल सुरू होताच आम्ही– मी व माझी बायको – घराबाहेर पडलो. सारसबाग व पेशवेपार्कमध्ये जाऊन पक्षी व प्राणी यांची ग्रहणातील हालचाल बघायची होती. जमले तर पर्वतीवर जाऊन ग्रहणातील माणसांची हालचालही बघणार होतो.

पण घराबाहेर पडून आम्ही टिळकरोडवर आलो व चकित झालो. रस्त्यावर जवळजवळ पूर्ण शुकशुकाट होता. एखाददुसरा नागरिक दिसत होता. एखादं वाहन दिसत होतं. सबंध देशभर हे झालं आहे ही त्या वेळी अर्थातच कल्पना नव्हती. रस्त्यावर एकही मूल नव्हते मग त्यांचा क्रिकेट खेळ कुठला?

अशा शुकशुकाटातून आम्ही सारसबागेकडे निघालो. आता रस्ता जास्तच निर्मनुष्य होता. आम्ही तीस वर्षांपूर्वी पुण्यात आलो तेव्हा दुपारी असेच निर्मनुष्य असे, तरी एवढे निर्मनुष्य नव्हते. हल्ली तर पुण्यात कोणत्याही वेळेला माणसे व वाहने यांची गर्दी होत नाही असे होत नाही. सारसबागेकडे जाताना वाटत होते – एवढी माणसे, एवढी वाहने गेली कुठे? बकासुराने पीडलेल्या नगरीत पांडव शिरले तेव्हा त्यांना, भयभीत नागरिक घराघरातून बसल्यामुळे असाच शुकशुकाट दिसला असेल किंवा नेपोलियन स्वारी करून रशियाची राजधानी पिटर्सबर्गमध्ये शिरला तेव्हा नागरिक निघून गेलेली ती परित्यक्त नगरी अशीच दिसली असेल का?

सारसबागेचा परिसर भयंकर शांत होता. रस्त्यानं जात असता रस्ते अंगावर आल्यासारखं वाटत होत. वाटत होते आम्हाला लोक वेडे म्हणत असतील. खरोखरच त्या नीरव शांततेतून जात असता आम्हाला वेड्यासारखं वाटत होतं. एखादी अनुचित गोष्ट करीत असावं तसं अपराध्यासारखं वाटत होतं.

सारसबागेत कुठे कुठे झाडाखाली एखादा माणूस होता. जरा पुढे जाताच प्रेमी युगल दिसले. तो शांततेइतकाच विलक्षण देखावा होता. परस्परांशी गुंजण्यात व निकटतेत दोघे मग्न होती. त्यांना ग्रहणाचं भान नव्हतं. राहू सूर्याला गिळतोय याचं भान नव्हतं किंवा ग्रहणकाळी सूर्यामधून निघणाऱ्या घातक किरणांची पर्वा नव्हती. त्याला तिचा स्पर्श हवा होता. तो तिच्या दंडाला बोट धरीत काही विचारीत असता ती लज्जित होत होती.

पुष्कळांना हा प्रकार अनुचित वाटेल; पण अशा प्रसंगी काही वेळा काही माणसांच्या हातून असे घडते खरे. पुष्कळ वेळेला इतरांना अशुभ वाटणारी गोष्ट एखाद्याला आनंद व आशा देते. टॉलस्टायच्या 'वॉर ॲन्ड पीस' या कादंबरीतला नायक प्रथम परिचयातच नाताशाच्या प्रेमात पडतो आणि तिच्या घरून आपल्या गावाकडे जाताना त्याला धूमकेतु उगवलेला दिसतो. ज्या धूमकेतूने जगाला दुःखी केले तो धूमकेतू नायकाच्या मनात उल्हासाची भरती आणतो असे वर्णन टॉलस्टायने केले आहे. काय सांगावं? सर्वत्र धास्ती पसरवून गेलेले हे ग्रहण त्या जोडप्याच्या सर्वांत सुखद स्मृतीतील एक होईल.

या ग्रहणाच्या परिणामाची सर्वंकश व्याप्ती दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांतून कळून आली. मला सर्व वर्तमानपत्रे वाचावयास मिळाली नाहीत. केसरी, लोकसत्ता, तरुण भारत, महाराष्ट्र टाइम्स, टाइम्स ऑफ इंडिया, संडे स्टॅंडर्ड एवढी वर्तमानपत्रे प्रथमच चाळली. पैकी लोकसत्तेचा मथळा– 'दुपार अंधारली-चंद्रताऱ्यांनी नभोनाटय रंगविले' मला आवडला. तसाच तरुण भारतचा 'निरभ्र आकाशातील खग्रास सूर्यग्रहणाचे मनोहारी दर्शन' हा मथळा चांगला वाटला. (शतकातील अपूर्व सौरदृश्य) 'धी सेंच्युरीज सोलर स्पेक्टॅकल' असा इंग्रजी मथळा संडे स्टॅंडर्डने दिला तोही चांगला होता; पण ग्रहणाविषयी जे सर्व सांस्कृतिक व आधुनिक धरून मनात असते त्याचे समाधान त्यात नव्हते. 'ग्रहणपर्वात भारतभर भीतीचे वातावरण' हा वस्तुस्थितीचे

बरेचसे निदर्शन करणारा वाटला; पण बाकीचे खूपच वाटणे त्यातून गळले गेले आहे असे वाटले. टाइम्स ऑफ इंडियाचे मथळे आपण या देशीचे नव्हेत असे 'अँग्लो-इंडियनी' वाटले. 'ऑल सेट फॉर रेअर एक्लिप्स–' (ग्रहणासाठी सर्व सज्ज) किंवा 'आकोला अगॉग वुइथ एक्साइटमेंट' हे दोन्ही मथळे विशोभित वाटले. 'प्रवाशांची' मोठी गर्दी–रहिवाशी मात्र शात' हा सकाळचा मथळा मला कशासाठी काय हे न कळणारा वाटला.

आणखीही खूप चागले-वाईट मथळे असतील; पण मी वर्तमानपत्रात एक प्रमुख बातमी कशी आली व ती मला कशी वाटली हे सागण्यासाठी–त्यात वर्तमानपत्रांच्यावर काही टीका करण्याचा हेतू नाही– वाचक म्हणून मी लिहितो आहे. मी स्वतः खग्रास ग्रहणाच्या पट्ट्यात ग्रहण पाहण्यास जाऊ न शकल्याने कुणी कुणी काय काय लिहिले व काय काय आवडले हे सागण्याचा मोह मला आवरत नाही. अर्थात हे सागता सांगता ग्रहणाचे वातावरणही मी थोडक्यात उभे करणार आहे.

८२ वर्षांनंतर भारतात हे खग्रास ग्रहण दिसले. *याच जागी ३६० वर्षे पुन्हा खग्रास* ग्रहण दिसणार नाही. मात्र १९९५ मधे थोडे उत्तरेस भारतात असेच ग्रहण दिसेल. एकशेतीस किलोमीटर खग्रास ग्रहणपट्टीची रुंदी वगैरे माहिती, ग्रहणाचे फोटो व नकाशे सर्व वर्तमानपत्रानी उत्तम दिले. पण जिथे बातमीदार ग्रहणाचे वर्णन करतो तेथे फरक पडलेला आढळला. महाराष्ट्र टाइम्सने 'सूर्य झाकाळला गेला', 'शास्त्रज्ञांची पर्वणी' 'तपमान घसरले', 'स्नान, जपजाप्य, दानधर्म' असे लहान लहान सार्थ मथळे देऊन चांगले चित्र उभे केले. 'पुण्यात भीतीचे वातावरण' म्हणून सकाळने ग्रहणावेळची मनःस्थिती चागली दिली आहे. लोकसत्तेतील ग्रहण-चित्राची कल्पना छान वाटली. ग्रहणाविषयी विविध प्रसग व माहिती त्यात आहे.

तरुण भारत व रविवार सकाळच्या बातमीदारांनी ग्रहणाबरोबर प्रवास करून केलेली वर्णने, त्यात बातमीदाराचे स्वत चे निरीक्षण घातल्याने रसाळ उतरली आहेत. त्यावरून गोकर्ण–अंकोरा येथे काय काय झाले हे कळते. या पर्वणीत लहानथोराना स्नान घालून पुण्य मिळवितात हे मला ठाऊक नव्हते. सकाळने ते दिले आहे. त्यांनी लिहिले आहे, 'गोकर्ण, अकोला, हुबळी, कारवार या पट्ट्यातील प्रत्येक गाव सचारबंदी व मार्शल लॉ पुकारल्यागत सुप्त आणि भीतिमय शात होता.' 'तीन वाजून पाच मिनिटानी यल्लापूरजवळ आम्ही थाबलो त्या वेळी नैसर्गिक ऊनसावल्यांचा खेळ पहायला मिळाला. आम्ही झाडाखाली बसलो होतो त्या ठिकाणी असंख्य चंद्रकोरी अधिकाधिक आकुंचित होत असल्याचे दृश्य दिसत होते...' शेवटी त्यानी लिहिले आहे– 'या वेळेपर्यंत जमिनीवर पुन्हा एकदा सावल्याच्या लाटा आदळल्या, गोलाकार फिरल्यासारख्या वाटल्या नि हळूहळू सूर्याची कोवळी किरणे पृथ्वीवर आक्रमण करू लागली.'

वर दिलेल्या इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रांत तरुण भारतची काही माहिती जास्त वेगळी होती. फोटोही विलक्षण होते. 'कागो ते पूर्व चीन– खग्रास ग्रहणाचा प्रवास' ही माहिती मला अन्यत्र आढळली नाही. आफ्रिकेतील रहिवासी कसे वागले हे त्यात आले व आणखीही तसेच पुण्यातील वातावरण त्यात सर्वांत चागले वाटले. 'भीतीखाली दबलेले औत्सुक्य व कमालीची शातता' या शीर्षकाखाली ते आहे. त्यास वय बारा व दहा असलेल्या *जोशीभगिनीनी पत्र धाडून अनुभव* कळवावे हा प्रसग, तसेच कॅन्सरच्या पेशंटचा अनुभव हे निराळे आहेत.

◻

या सर्व ग्रहणात लोकांच्या अवास्तव भीतीबद्दल सर्वांनी लिहिले आहेच. पण त्या अनुभवाबरोबर अगदी उलट एक हिंमतीचा अनुभव म्हणजे 'दे दान सुटे ग्रहण' आरोळ्या बंद होत्या हा. जे दान मागत येत त्याची परिस्थिती पाहिल्यावर त्यानी काही तासात होणारी कमाई दूर फेकली या त्याच्या धीराचे कौतुक करायला हवे. असे दान मागणे अपमानास्पद आहे हे पटल्यावर रस्त्यावर न येणे यातला सयम पाढरपेशास कळणार नाही. पगारवाढ व बोनस यासाठी (भरपूर पगार असताही) गर्जना करीत व घोषणा देत रस्त्यावर येणाऱ्या स्त्री-पुरुषानी या लोकापासून अभिमान शिकावा.

◻

या ग्रहणावरून एक गोष्ट कळते की, शास्त्र किती सर्वंकश भीती उत्पन्न करू शकते. अर्थात एक पूर्वीचा अनुभव मी दिला आहे. एच. जी. वेल्स यांच्या 'मगळाचा हल्ला' अशा काही नावाच्या नभोनाट्यात मंगळावरून पृथ्वी जिकायला लोक आले असे आहे. ते खरे वाटून अमेरिकेभर पळापळ सुरू झाली होती. तेव्हा शास्त्र हे सर्वांना घाबरवू शकते. अगदी राहूकेतूच्या कल्पनेइतके घाबरवू शकते. या दोन्ही कल्पना (राहू केतू व शास्त्रीय) लोकाना घाबरवण्यासाठी निघाल्या असे म्हणता येणार नाही. लोकाचे मनोबल कमी पडते आहे या ग्रहणात दोनच निर्भय माणसे बाहेर होती– एक शास्त्रज्ञ व दुसरे नदीवर जाऊन जपजाप्य करणारे श्रद्धावान. अर्थात दोघाचे हेतु वेगळे होते.

डोळे जाण्याचे जे शास्त्रज्ञानी पसरविले ते फारच एकागी होते. त्याहूनही वर्तमानपत्रानी त्याचा फारच गवगवा केला. शास्त्रज्ञानी ज्ञान दाखविण्यास व वर्तमानपत्रवाल्यानी खपासाठी सेन्सेशन म्हणून. आपली जुनी शास्त्राची पद्धत आहे ती त्याने अनुसरायला हवी होती. ग्रहण सर्वांना वाईट आहे असे ज्योतिषशास्त्र सागत नाही. ते राशिपरत्वे वाईट-चागली फळे सागते. डोळ्याना होणारा त्रास प्रकृतिमानाप्रमाणे आहे असे असले पाहिजे. कारण ज्याना त्रास झाला असे लोक थोडेच दिसतात.

मी बारा वर्षांचा असताना एक सूर्यग्रहण झाले असले पाहिजे. आम्ही तेव्हा काचा काळ्या करून पाहिले; पण उघड्या डोळ्यानीही पाहिले. हे ग्रहण खडग्रास असावे. पण त्या वेळी उतरलेला काळोख, पक्ष्याचे ओरडणे, कुत्री भुंकणे आणि गाढवाचे ओरडणे मला चागले आठवते आहे.- आता सारसबागेतून गणपतीमंदिरात जात असता ग्रहणाचा परिणाम कळू लागला होता. हळूहळू उन्हे कमी होत होती. आम्ही देवळात शिरलो तिथे आमच्या कल्पनेहून फारच कमी माणसे–म्हणजे पंधरावीस, पठण करीत किंवा, जप करीत बसली होती.

दर्शन घेऊन आम्ही बागेत येऊन बसलो. तेथील पक्ष्याची हालचाल मुख्यत बघावयाची होती. आम्ही बरोबर एक्सरेची प्लेट नेली होती. बागेत एखाददुसरा जात-येत होता त्यापैकी एक दोघे तरुण पण कमी शिकलेले होते. त्यांनी आमच्या प्लेटमधून ग्रहण पाहिले व त्यांना मी सूर्यग्रहण कसे होते हे सांगितले. ग्रहणाच्या दिवशी ज्ञान दिल्याचे पुण्य घेतले. आता हळूहळू प्रकाश मंद होत चालला. जास्तीत जास्त गर्द रगाचे गॉगल घालीत रहावे तसा प्रकाश मंद होत चालला होता. तो प्रकाश, सध्याकाळसारखा असून संध्याकाळसारखा नव्हता. त्यात सध्याकाळच्या क्षितिजावरचे गुलाबी लाल रंगाचे खेळ नव्हते. पशुपक्ष्याना ग्रहण भयभीत करीत असते ते त्यामुळेच असावे. आम्ही सारखे पक्ष्याकडे पहात होतो. *एक घार अगदी खाली* उतरली, एक दोन पक्ष्याचे थवे झाडाकडे आले. आम्हाला वाटले की पक्ष्याची हालचाल सुरू झाली; पण एवढ्या वेळेपर्यंत ग्रहणाने शीग गाठली होती. हळहळू उजेड वाढू लागला. तसे काही विशेष न घडता आम्ही परत आलो.

यावरून माझ्या एक लक्षात आले की, शास्त्रज्ञांनी पशुपक्ष्यावरील ग्रहणाच्या परिणामाचा अभ्यास करीत असता जरा पाठीमागे वळून आपल्या मानवबधूचे निरीक्षण करायला हवे होते. *या ग्रहणात माणस या* या प्राण्याची वागणूकच अभ्यास करण्या-सारखी होती.

◻

# संपर्कमाध्यमे

## खऱ्या स्वायत्ततेला नकार

वा. दा. रानडे

आकाशवाणी, दूरदर्शन या जनतासंपर्क-माध्यमाना इंदिरा गांधीचें नवे सरकार कितपत स्वायत्तता देईल, यावद्दल व्यक्त करण्यात आलेल्या शंका खऱ्या ठरल्या आहेत. या दोन्ही माध्यमाना स्वायत्तता देण्याच्या उद्देशाने पूर्वीच्या जनता सरकारने मांडलेले प्रसार भारती विधेयक लोकसभा विसर्जना-बरोबर बारगळले आणि आता नवे सरकार याबाबत नवे बिल मांडणार नाही. सरकारला तशी आवश्यकताच वाटत नाही असे केंद्रीय माहितीमंत्री वसत साठे यानी नुकतेच एका मुलाखतीत सांगितले. त्यामुळे या माध्यमाना स्वायत्तता मिळण्याची आशा दुरावली आहे.

संपर्कमाध्यमाची स्वायत्तता ही लोक-शाहीचा एक आवश्यक भाग आहे. सरकारी धोरणाच्या प्रचारासाठीच ही माध्यमे राब-विली जाणार असतील तर खुले विचारप्रदर्शन आणि त्यातून लोकमताची घडण या प्रक्रिया व्यवस्थित होणार नाहीत. ही दोन्ही फार प्रभावी माध्यमे आहेत. विशेषतः बहुसंख्य लोक निरक्षर असलेल्या आपल्या देशात ही माध्यमे म्हणजे लोकाशी संपर्क साधण्याची परिणामकारक साधने आहेत. सत्तारूढ पक्षाने ही साधने आपल्या प्रचारासाठी राबविणे योग्य नाही अशी टीका विरोधी पक्ष अनेक वर्षे करीत आलेले आहेत. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी काँग्रेसने पूर्वी चदा समिती नेमली होती. तिने आपल्या अहवालात आकाशवाणीला स्वायत्तता देण्यासाठी स्वायत्त महामंडळ स्थापण्याची शिफारस केली होती. सरकारने ती मान्य केली नाही.

जनता सरकारच्या राजवटीत या प्रश्ना-साठी वर्गिस कमिटी नेमण्यात आली. तिने या दोन्ही माध्यमांना स्वायत्तता देण्याची आणि त्यासाठी 'आकाशभारती' नावाचे स्वायत्त महामंडळ स्थापण्याची शिफारस केली होती. जनता सरकारने वर्गिस कमिटीच्या शिफारशी पूर्णपणे मान्य केल्या नाहीत. कमिटीचे अध्यक्ष वर्गिस, सभासद पु. ल. देशपांडे यांचे सरकारी निर्णयाने समाधान झाले नव्हते. कारण समितास ज्या स्वरूपाची स्वायत्तता अपेक्षित होती त्यावर सरकारी निर्णयाने काही मर्यादा पडत होत्या. सरकारी निर्णयावर आधारलेले विधेयक लोकसभेपुढे मांडण्यात आले. हे बिल पूर्णपणे समाधान-कारक नसले तरी ही दोन्ही माध्यमे सरकारच्या हातची प्रचारसाधने बनण्यापेक्षा ते निश्चित पुढचे पाऊल होते. पण इंदिरा गांधीच्या राजकारणाला काहीही बदल नको आहे.

या दोन्ही माध्यमाना कारभाराच्या बाबतीत स्वायत्तता (फंक्शनल अॅटॉनॉमी) पुरेशी आहे आणि सध्याच्या कायद्याने ती दिलेली असल्याने त्यात काही बदल करण्याची आवश्यकता सरकारला वाटत नाही, म्हणून याबाबतीत कोणतेही नवे बिल सरकार मांडणार नाही असे मंत्री साठे यानी सांगितले. कायद्याने स्वायत्तता आणि कारभारात स्वायत्तता हा श्लेष साठे यानी काढला तो फसवा आहे. कायद्याने मिळणारी स्वायत्तता हीच खरी स्वायत्तता, ती सरकारला हिरावून घेता येणार नाही. उलट कारभाराच्या बाबतीतली स्वायत्तता सरकारच्या लहरीवर अवलंबून राहील.

आपल्या माध्यमाशी संबधित सर्व प्रश्नां-बाबत निर्णय घेण्याची, धोरण ठरविण्याची स्वायत्तता हा स्वायत्ततेचा प्राण होय. अशी स्वायत्तता देण्याची साठे यांची तयारी नाही. त्यानी तसे स्पष्ट म्हटलेले नाही. पण त्यांच्या मुलाखतीतून ते सूचित होते. कोणते कार्यक्रम कशा पद्धतीने सादर व्हावेत, त्याना किती महत्त्व व वेळ दिला जावा यासबंधी मार्ग-दर्शक सूचना सरकार देत राहणार आणि निरनिराळ्या आकाशवाणी केंद्राना त्या पाळाव्या लागणार. हा अधिकार सोडण्या-चीही साठे याची तयारी दिसत नाही. महत्त्वाच्या बाबतीत याप्रमाणे अधिकार स्वत:कडे ठेवून बाकीच्या बाबतीत सरकारने या माध्यमाना स्वायत्तता दिली तर त्याला कार्य अर्थ राहिला? सरकारी खात्याचा एक भाग म्हणूनच ही दोन्ही माध्यमे नियंत्रित करण्यात येत आहेत. त्यात काही बदल करण्याची आवश्यकता सरकारला वाटत नाही आणि तशी सरकारची तयारीही दिसत नाही.

आकाशवाणी व दूरदर्शन यावरचे आपले नियंत्रण सोडायला सरकार का तयार नाही? विकसनशील देशात समाजपरिवर्त-नाचे एक परिणामकारक साधन म्हणून या दोन्ही माध्यमाचा उपयोग करता येतो. सरकारला आपल्या कार्यक्रमाचा प्रचार करून सामान्य जनतेपर्यंत तो पोचविण्यासाठी या दोन माध्यमांइतके प्रभावी साधन नाही. त्याच्या शक्तीचा पूर्ण उपयोग करून घ्याव-यास हवा. या माध्यमाची सूत्रे स्वायत्त महामंडळाकडे पूर्णपणे सोपविल्यास या माध्यमाचा या उद्देशाने कितपत वापर केला जाईल अशी सरकारला शंका वाटते, म्हणून त्याना स्वायत्तता देण्याचे सरकार नाकारीत आहे काय, असा एक विचार मनात येतो. करमणूक कार्यक्रमाना अधिक महत्त्व दिले जाईल. शैक्षणिक कार्यक्रमाना, सरकारी धोरणाचा प्रचार करणाऱ्या कार्यक्रमाना गौण स्थान मिळेल अशी शका सरकारला वाटत असल्यामुळे ही स्वायत्ता नाकारली जात असेल. यापैकी सरकारी धोरणाचा प्रचार करणाऱ्या कार्यक्रमाना गौण स्थान मिळेल ही भीती अधिक महत्त्वाची. जन-मनावर प्रभाव गाजविणारे आपल्या हातचे हे हुकमी साधन सोडायला सरकार कसे तयार होईल?

येथे एक भेद करायला हवा. सरकारी प्रचाराचे कार्यक्रम आणि देशविकासाच्या व्यापक दृष्टिकोनातून लोकशिक्षण देणारे कार्यक्रम यापैकी दुसऱ्या प्रकारचे कार्यक्रम या दोन्ही माध्यमावर असले पाहिजेत, या-बद्दल दुमत होण्याचे कारण नाही; पण अशा कार्यक्रमाच्या बुरख्याआडून सरकारच्या व सत्तारूढ पक्षाच्या धोरणांचाच प्रचार या माध्यमाद्वारे होणार असेल तर ते मात्र योग्य नाही. सरकारच्या हाती ही माध्यमे ठेवली तर त्याचा दुरुपयोग केला जाण्याचा धोका आहे. म्हणून धोरण ठरविणे, निर्णय घेणे यासह पूर्ण स्वायत्तता या माध्यमांना मिळा-यला हवी.

लोकमतावर परिणाम करण्याच्या दृष्टीने ही माध्यमे किती प्रभावी आहेत याचा अनुभव नुकताच सूर्यग्रहणाच्या निमित्ताने आपल्याला आलेला आहे. आकाशवाणी व दूरदर्शनवर दक्षता म्हणून दिलेल्या सूचना-मुळे लोकामध्ये एवढी घबराट झाली की, ते घरीच बसून राहिले. शतकातून एकदा-दोनदा येणारा हा निसर्ग-चमत्कार पाहण्याची संधी बहुसंख्य लोकांनी गमावली. दक्षतेच्या सूचना, धोक्याची जाणीव जरूर द्यायला हवी; पण तेवढ्याने सरकारचे कर्तव्य संपत नाही योग्य ती दक्षता घेऊन हे ग्रहण जरूर पहा, लोकाना दाखवा, सरकार निर्धोक काचा पुरविण्याची व्यवस्था करीत आहे असे सरकारने जाहीर करून काचा पुर-वायला हव्या होत्या. ग्रहण काही अचानक आले नाही. व्यवस्था करायला सरकारला भरपूर अवधी होता. ☐

# मुक्काम शिवतक्रार

नामदेव माळी

६ जून १९७८ पासून 'ग्रामायन' या संस्थेने व या संस्थेचा कार्यकर्ता म्हणून मी शिरूर तालुक्यातील 'शिवतक्रार' या गावी कामाला सुरुवात केली. पहिले काम होते, ८।१० वर्षे बंद पडलेले लिफ्ट सुरू करून, गावच्या जमिनी पुन्हा भिजवण्याचे व गावाला कर्जमुक्त करण्याचे. हे काम निम्मे-अधिक यशस्वी झाल्यावर व उरलेले मार्गी लागल्यावर गावच्या सास्कृतिक विकासाकडे आम्ही लक्ष द्यायला सुरुवात केली.

तरुणांची विस्कटलेली घडी जुळून येत होती. गावच्या जयहनुमान तरुण मडळाची स्थापना १९७४ साली होऊनही त्या वेळी त्याची अवस्था असून नसल्यासारखी होती. तीच सुप्तशक्ती पुनः अस्तित्व धारण करू लागली होती. पुनः गावचा विकास त्याच्या डोळ्यांसमोर नाचू लागला. गावचा विकास व्हायचा असेल तर गावातील भाडणे थाबली पाहिजेत; पण गावातील भाडणे कशी थांबणार ? कारणाचा शोध सुरू झाला. दारू हे एक मुख्य कारण आहे, हे तरुणाना उमगले. पण दारू कशी बंद करणार ? वर्षानुवर्षाची लोकांची सवय. ती काय चुटकीसरशी दूर होणार ? हे अशक्य आहे. आपला बापच दारू पितोय तर त्याला कसं दारू पिऊ नको म्हणून सांगणार ?

दुसऱ्याला सांगणं तसं सोपं असतं, नाही? हे काम जरा अवघड दिसतंय ! पण हे काम नाही झालं तर आपण विकास तो काय साधणार ? नाही. हे नाही चालणार. दारू बंद झालीच पाहिजे. गावची दारू बंद झालीच पाहिजे ! अनेक प्रश्न-उपप्रश्नांच्या जाळ्यातून स्वत.ची सुटका करून घेऊन शेवटी दारूबंदीचा निर्णय तरुणांनी घेतला.' दारू बद झाली तरच आपली लिफ्ट व्यवस्थित चालेल, वरचेवर मागच्यासारखी भाडणे होऊन ती बंद पडणार नाही, अशी तरुणाची मनोमन खात्री झाली

तरुणांनी गावात दारूबंदीचा प्रसार सुरू केला. गावात दारू पिणे व विकणे बंद. दारू पिऊन गोंधळ घालणे बंद; पण मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बाधायची ? तरुण-मंडळाची सभा चालू असताना व्यक्ती जोषात बोलायच्या; पण व्यक्तिगत पातळीवर त्यांची घाबरगुंडी उडालेली असायची. आपण एखाद्याला बोलायचो आणि तो आपल्यावर डाव धरायचा. उगीच कशाला बलामत (संकट) ! परंतु तरुण पुन्हा पुनः विचार करायचे आणि ह्यातूनच त्याची संघटित शक्ती वाढत होती. अशातून पाण्यात राहून माशाशी वैर कशाला म्हणणारी मंडळी पुढे सरसावयाची. आपली ताकद पणाला (भीतभीत) लावायची. त्याचा परिणाम गावात नक्कीच होऊ लागला. हळूहळू दारू बंद व्हायला लागली; परंतु काही लोक चोरून दारू पिऊ लागले.यावेळी तरुणांनी स्त्रियांना आपल्या बाजूला घेतले नव्हते. बाहेरगावावरून येणारी दारू बंद झाली. बाहेरगावच्या माणसाना आपल्या गावात दारूविक्रीसाठी प्रतिबंध करणे सोपे असते. पण जर गावचीच व्यक्ती दारूविक्री करू लागल्यावर त्यावर नियंत्रण ठेवणे जरा जिकिरीचेच असते. नात्यागोत्याचा संबंध असतो. काही दिवस तरुण मंडळ सुस्तावल्यावर गावातल्या एका वस्तादाने गावातच दारूविक्री सुरू केली. भरदिवसा गावात फुगे येऊ लागले. माणसे गावातच भेलकांडू लागली. भांडणाचा सुळसुळाट. तरुण हताश झाला. स्वतःच्या शक्तीवर विश्वास बसेना. पोलिसाचे सहाय्य घ्यावे लागले. प्रतिसाद चांगला मिळाला. पोलिसांनी संबधित माणसास अटक केली. वातावरण पुन्हा शांत वाटले. गावातील दारू पिणे बंद होईल; पण गावातील लोकाना वाटलं फक्त दारू विकण्यावर बंदी आहे, पिण्यावर नाही. त्यामुळे काही दिवस चोरून पिणारे उघड उघड पिऊ लागले. एक-दोन तरुणही गोडी चाखू लागले. तिची गोडी अवीटच असते म्हणतात ! तरुण दारू पितात म्हटल्यावर म्हाताऱ्याना तर मग चळच सुटला. वातावरण पुन्हा दूषित.

पण आता तरुण खूप शहाणा झाला होता. तो विचार करीत होता. तो बऱ्याच अंशी भीतीमुक्त होत चालला होता. त्याने पुन्हा कंबर बाधली. गावातूनही पाठिंबा उभा राहिला.

९ जानेवारी १९८०. रात्रीचे ८॥ वाजलेत. गावातील स्त्री-पुरुष, तरुण-तरुणी चावडीसमोर जमलेत. सारे झाडून आलेत. आयुष्यात पहिल्यादाच स्त्रिया पुरुषाबरोबरीने बसल्या आहेत. तरुणानी विषयाला सुरुवात केली. गावचा विकास, गावचे प्रश्न, गावची भाडणे, भाडणाना कारणीभूत असणारी व विकासाला प्रतिरोध करणारी दारू. ह्याचा बंदोबस्त कसा करणार ? आम्ही आतापर्यंत खूप प्रयत्न केले. हा शेवटचा निर्णय आणि हा निर्णय सगळ्यानी घ्यायचा आहे. कारण प्रश्न सगळ्याचा आहे त्यामुळे सगळ्यानी झटलं पाहिजे. मुख्य विषय दारूबदीचाच. स्त्री-पुरुषानी चर्चेत भाग घेतला. दारू बंद करण्याचा सगळ्यानी ठाम निर्णय घेतला. गावच्या हद्दीत दारू पिऊन यायच नाही व दारू विकायची नाही आणि प्यायची नाही. जर कोणी दारू पिल्याचे वा विकल्याचे आढळून आले तर त्याला झाडाला बाधायचे. पाहुणा दारू पिऊन आला तर त्याला समजावून सागायचे; पण तो ऐकत नसेल तर त्याचा बंदोबस्त आपण करायचा. घरात नवरा दारू पिऊन आला तर त्याच्या बायकोनं येऊन गावकऱ्यांना सांगण्याचे उत्स्फूर्तपणे कबूल केलं. झंजावाती चर्चा झाली· गावची उपसाजलसिंचन योजना, गावचा विकास, शाळा सुधारणा इ. विषयांवर चर्चा होऊन गावसभा समाप्त झाली आज तरुण भलतेच उत्साहात होते.

दुसऱ्या दिवसापासून सगळीकडे वातावरण शांत. दारूबंदीची वार्ता कानोकान पसरली. ८–१० दिवसांत एक-दोन लोक बाहेरगावी दारू प्यायल्याचे समजले. त्याना तरुणांनी वॉर्निंगही दिली, तसे शांत शांत होते.

१८ जानेवारीचा दिवस. सुगीचे दिवस असल्याने गावकरी शेतात राबत होते. संध्याकाळ होताच गावची चाहूल लागली. दोन–तीन लोक दारू पिऊन आल्याची वार्ता कानोकान पसरली. तरुण मंडळ वैतागले. काही लोक म्हणू लागले, 'काय करतय तरुण मंडळ !' पण घडलं उलटंच. रात्री ८ वाजता सर्व तरुण एकत्र झाले. कोण कोण

दारू प्याला त्याची चवकशी सुरू झाली. एक तरुण म्हणाला, 'माझा म्हातारा दारू पिलाय. त्याला चांगला झोडा. झाडाला बांधा. मी बांधतो झाडाला माझ्या म्हाताऱ्याला !' दुसरा एक मुंबईवाला दारू प्याला होता. प्रथम मोर्चा साठी ओलांडलेल्या म्हाताऱ्याकडे. म्हातारं तसं तापटच. पण पोरही आज तापटच झाली होती. म्हाताऱ्याला विचारलं. म्हातारा दाद देईना. पोरानी म्हाताऱ्याची कावड केली आणि नेली चावडीवर. नंतर मोर्चा मुबईवाल्याकडे. पहिला प्रकार पाहून तो गपगुमान चावडीकडे चालता झाला. तरुणानी प्रश्न सुरू केले; पण म्हातारा दाद देईना. अखेर त्याला बांधण्यासाठी दोर आणला. त्यावर म्हातारा म्हणाला, 'माजी चूक झालीय. पुना दारू पिलू तर फाशी द्या! मग तर झालं ना ? पण दोर आननाराचा काटा काडल्यावाचून ऱ्हानारच नाही !' त्यावर तरुण भडकले. अखेर म्हाताऱ्याला माफी मागावी लागली. तेवढ्यात त्या म्हाताऱ्याचा योक मुलगा आला व म्हणाला, 'थाबा माझं ऐका आपला निर्णोय काय झाला, की कुनी दारू पिल त्येला झाडाला बादायचा. आज माझा म्हातारा जरी दारू प्येला आसला तरी तुम्ही त्येची गय करू नका. त्याला झाडालाच बाधा. तरच ह्या दारूला आळा बसल ऱ्हाय तर तुमच्या हातानं कामच होणार ऱ्हाय !'. ह्यावर म्हातारा खूपच भडकला; पण उपयोग काय? आता मोर्चा वळला मुबईवाल्याकडे. तो म्हणाला, 'मला काय शिक्षा करायचीय ती करा, मी भोगायला तयार हाय.' त्यावर पोरांनी त्याला खूपच झापला. शेवटी दोघानी माफी मागून पुन्हा दारू न पिण्याचे वचन दिल्यावर पोरांनी त्यांना सोडून दिले.

हा सगळा गाजावाजा ऐकून गावातील स्त्री–पुरुष गोळा होऊन, हा सगळा देखावा आश्चर्याने चकित होऊन पहात होते आणि मनोमन कल्पना करीत होते की, आता दारू बंद झाली.

□

बगाड (८)

# भांबावलेला यतिधर्म

बघ्या

आमचे मित्र अण्णासाहेब अस्वस्थ झाले असणार, अशी माझी अटकळ होतीच. ते गोंधळले असतील, असहाय्य आणि हताश झाले असतील असेही मला वाटले होते; परंतु ते रागावले असतील आणि त्वेषाने भलतेच काही बोलतील असे मात्र मला वाटले नव्हते. अण्णासाहेब संघवाले मुळीच नाहीत. संघाच्या जाळ्यात मनुष्य ज्या वयात सापडतो त्या वयाचे अण्णासाहेब होते तेव्हा संघ जन्माला यायचा होता. परंतु एकूणच मध्यमवर्गीय ब्राह्मण माणसाला संघाविषयी सहानुभूती वाटते; संघातील माणसे चारित्र्यसंपन्न असतात असा विश्वासपूर्वक अभिमान वाटतो आणि सार्वजनिक कामाची हौस आहे, पण वकूब नाही अशा लोकांना सार्वजनिक जीवनात स्वच्छतेने आणि तडफेने काम करण्याविषयी जे कौतुक वाटत असते तसेच कौतुक अण्णासाहेबांना स्वयंसेवकांविषयी वाटते.

अशा प्रकारची मनःस्थिती असणारे आमचे अण्णासाहेब बाळासाहेब देवरसांची अहमदाबादेतील मुलाखत वाचून अस्वस्थ, हताश आणि असहाय्य होतील यात शका नव्हती. परंतु ते देवरसावर रागावतील आणि 'ही मुलाखत संघप्रमुख बाळासाहेब देवरसांची की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकऱ्याची' असा संतापयुक्त सवाल करतील अशी मात्र अपेक्षा नव्हती. संघप्रमुख म्हणताच 'दक्ष' करणारे अण्णासाहेब नव्हेत; तरी कोणी आदरणीय नेते असावेत आणि असतात अशी श्रद्धा बाळगणाऱ्यांपैकी अण्णासाहेब असल्याने आणि तशा नेत्यांपैकी देवरस आहेत असा विश्वास ते व्यक्त करीत असत, त्यामुळे अण्णासाहेबांच्या संतापाची परमावधी झाली आहे असेच म्हटले पाहिजे.

## गोंधळाची राजकीय परिस्थिती

गेली दहा वर्षे संपूर्ण सार्वजनिक जीवन घुसळून निघाले आहे. निष्ठा, विश्वास, मैत्री, समझोते, विचारप्रणाली या गोष्टी टिंगलीपुरत्याच उरल्या आहेत. ही स्थिती उद्वेगजनक आहे असे तर कोणी मानत नाहीच; परंतु या कल्पना उराशी बाळगून कधी काळी राजकारण करण्याइतक्या मागासल्या अवस्थेत आपला समाज होता याचीच लाज कित्येकांना वाटत असते. येथे स्वदेश-निष्ठा, कायदेशीर आचरण, वैयक्तिक चारित्र्य यांचा उल्लेख मुद्दामच केला नाही. कारण अशा सद्गुणांचा सार्वजनिक कार्याला अडथळाच येतो हे सर्वमान्य झाले आहे.

राजकीय नेतृत्वाची ही अशी अवस्था असताना राजकीय आणि सामाजिक संस्था तग धरून राहतील आणि भरकटलेल्या राजकारण्याना ताळ्यावर आणतील अशी अपेक्षा असते; पण या संस्थांची जी धूळधाण उडाली आहे तिची दखलही कोणी घेतलेली नाही. संसद ही देशातील अद्वितीय आणि सर्वोच्च संस्था. 'ही संसद म्हणजे पंतप्रधानाचा कुंटणखाना आहे' असे एका वर्तमानपत्राने ५ वर्षांपूर्वी लिहिले होते. हे प्रकरण सभागृहापुढे आणलेदेखील; परंतु हक्कभंगाची चौकशी सुरू केल्यास भलत्याच भानगडी बाहेर येतील अशी भीती वाटून राज्यसभेने या मानहानीकडे दुर्लक्ष करण्याचे ठरविले. न्यायसंस्थेची कुतरओढ तर दयनीय आहे. राज्यकर्त्या पक्षाच्या अध्यक्षाने एके काळी शेतकरी-कामकरी जनतेला आवाहन केले होते की, त्यांनी न्यायालयाला वेढा घालून न्यायाधीश श्रमकरी जनतेविरुद्ध निर्णय देणार नाहीत अशी तजवीज केली पाहिजे. सध्याच्या सरन्यायाधिशांनी आणीबाणीतील स्थान-

बद्धतेविषयी आपण दिलेल्या निर्णयाची आपल्याला लाज वाटते असे कबूल केलेच होते. पूर्वी कोठेही अपप्रकार घडला की, न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी होत असे गेल्या चार वर्षांच्या अनुभवानंतर लोकांच्याकडून अशी मागणी होत नाहीच, उलट सरकारच अशी चौकशी करण्यास उत्सुक असते, असे दिसून येते. 'राष्ट्रपतींना राजकीय बाबतीत ओढून त्या पदाची प्रतिष्ठा कमी करू नका' असे आवाहन खुद्द राष्ट्रपतींना करावे लागते यावरून त्या सर्वोच्च पदाची पत कितपत उरली आहे याचाही अंदाज येतो.

नांगर तुटलेल्या तारवाप्रमाणे आपले राजकीय जीवन दर निवडणुकीत येणाऱ्या उलटसुलट लाटांचे तडाखे खात भरकटत चालले आहे. ही त्याची अवस्था का झाली याचा जो तो आपल्या परीने विचार करत दुसऱ्याला दोष देत आहे. कोणी राजकीय पुढाऱ्यांना नालायक ठरवतात, कोणी लाचलुचपतीने बरबटलेल्या नोकरशाहीला शिव्या घालतात, कोणी भोगासक्त उच्चभ्रू लोकांना धारेवर धरतात. परंतु कोणाला दोषी ठरवून या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळते असे दिसत नाही.

## जनसामान्यांची चंचलता

सध्याच्या अनागोंदी परिस्थितीचे मूळ समाजाच्या अस्थिर मनोवृत्तीत आणि चंचलपणात आहे. ध्येयवाद, विचारप्रणाली, बळकट पक्षसंघटना, स्वच्छ नोकरशाही, सुरळीत सत्ताबदल आणि सूडवृत्तिविरहित सत्तास्पर्धा या आदर्श गोष्टी स्थिर समाजरचनेत असू शकतात; नव्हे अशी परिस्थिती दूरचा आदर्श म्हणून का होईना पण स्थिर समाज दृष्टीपुढे ठेवू शकतो. अस्थिर समाज या आदर्शांचा वेडे स्वप्न म्हणून अव्हेरच करील. ऐहिक सुखसमृद्धीची ओढ लागलेल्या असुरवृत्तीच्या समाजाला वर वर्णन केलेली राजकीय रचना जखडून टाकणारीच वाटणार.

साराच्या सारा समाज उपभोगाच्या आणि आसुरी संपत्तीच्या मागे लागलेला आहे असे म्हणणे एकांगी वाटेल; परंतु इतिहासात अशी परिस्थिती येऊन गेली आहे. बाराव्या आणि तेराव्या शतकात इटलीत अशीच परिस्थिती होती. संपत्ती, चैन आणि अधिकार याची झापड समाजावर येऊन नाना राजकीय पक्षात समाज विखरून गेला. पक्षबदल नित्याचे झाले आणि माणसे निरनिराळ्या पक्षात फिरती राहिलेली असूनही पक्षापक्षातल्या सूडभावना मात्र नाहीशा झाल्या नाहीत. डांटे या प्रख्यात कवीला सत्ताधारी पक्षाच्या सूडभावनेचे लक्ष्य होऊन वनवास पत्करावा लागला. आपली जन्मनगरी जी फ्लॉरेन्स तिची त्याने वातात असह्य दुःखाने तडफडणाऱ्या स्त्रीशी तुलना केली आहे.

Thyself to a sick woman wilt thou liken,

Who cannot find repose upon her down

But by tossing seeks to ease her pain.

फ्लॉरेन्समधल्याच मेडिसि घराण्याच्या इतिहासातील एक हकीकत तर आपल्या हल्लीच्या परिस्थितीला हुबेहुब जुळणारी आहे. मेडिसी घराणे फ्लॉरेन्समधले अतिशय श्रीमंत आणि राजकीयदृष्ट्या पुढारी घराणे होते. त्या घराण्याचा प्रमुख कॉसिमो हा महत्त्वाकांक्षी राजकारणी होता. त्यामुळे त्या वेळी फ्लॉरेन्सवर राज्य करणाऱ्या अल्बिझी नावाच्या मनुष्याच्या पक्षाने त्याला गुन्हेगार ठरवून तडीपार केले. त्यानंतर आल्बिझीच्या पक्षातच दुफळी माजली आणि कॉझिमो मेडिसीच्या मित्राच्या हाती सत्ता आली. तडीपार झाल्यानंतर एका वर्षाच्या आत कॉझिमो सन्मानाने परत आला आणि फ्लॉरेन्समध्ये सत्ताधारी झाला.

सारांश, ऐहिक उत्कर्षाची ओढ लागलेल्या समाजाकडून कोणत्याही क्षेत्रात—मग ते राजकीय असो, विद्योपासनेचे असो किंवा उद्योगधंद्याचे असो—निर्बंध आणि पथ्ये पाळली जावीत अशी अपेक्षा ठेवता येणार नाही.

## दुसरी शिट्टी

तिरीमिरीत स्वतःच्याच शरीरावर आसुडाचे फटकारे ओढणाऱ्या आणि बेताल नर्तन करणाऱ्या कडक लक्ष्मीच्या पुढील आविर्भावाविषयी अदाज बाधणे जसे अशक्य असते तसेच जनसामान्याच्या हालचालीविषयी होरा वर्तवणे अवघड झाले आहे. त्यामुळे अमुक व्यक्ती अगर संघटना काय करील याची चर्चा करण्यापेक्षा ती काय करते आहे याचा निर्लेप आढावा घेऊन त्या वर्तनाची सगती बसवण्याचा प्रयत्न करणे एवढेच तुमच्या-आमच्यासारख्या बघ्यानी करावे.

त्यामुळे श्री. देवरस यांची मुलाखत वाचून आम्हाला कोणताच धक्का बसला नाही. संघाची ही सततची भूमिका होती की आमची संघटना राजकारणापासून दूर रहाणारी आहे. कोणत्याही पक्षाला संघटना म्हणून आम्ही पाठिंबा देत नाही. स्वयंसेवक स्वयंस्फूर्तीने आणि व्यक्तिशः कोण्या पक्षाला मदत करीत असतील. अनेकांच्या विशेषतः समाजवाद्यांच्या मते ही ढोंगी भूमिका आहे. असेलही; परंतु ती भूमिका संघाने ७७ सालापर्यंत सोडली नव्हती. ७७ साली संघाने संघटनेच्या रूपाने प्रथमतः जनतापक्षाला निवडणुकीत मदत केली. त्याही वेळी संघातील सनातन्याना हे पटले नव्हते. त्याची समजूत अशी घालण्यात आली की, राजकारणापासून अलिप्त राहून सामाजिक व सास्कृतिक कामातून हिंदूना बलशाली करणे हे आपले नेहमीचे काम खरे; पण नेहमीपेक्षा निराळी राजकीय परिस्थिती निर्माण झाली असताना श्री पुन्हा ताळ्यावर आणण्यासाठी राजकीय बाबतीत निःस्पृह असणाऱ्या संघटनेने राजकारणात भाग घेतला पाहिजे. पूर्वीचे ऋषि-मुनी राजसत्तवर वेळोवेळी वचक ठेवून राजसत्ता अधःपतित होऊ देत नसत. या प्राचीन यतिधर्माचे

आपण पुनरुज्जीवन करीत आहोत.

७७ मधील निवडणुकीनंतर शिवाजी-पार्कवर झालेल्या सभेत देवरसांनी हे पुन्हा सांगितले होते की, आमचे मूळ कार्य संघ-स्थानावरच चालणार आहे; परंतु राजकीय कार्याची ओढ आणि विशेषत: सत्तेचे स्वप्न ह्यांची गोडी अनावर असते. संघकार्यकर्त्यांनी शिवाजीपार्कवर फुंकली गेलेली ही शिट्टी ऐकलीच नाही. ते जनतापार्टीच्या ओसरी-माजघरातच फिरत राहिले. आपला गृहस्था-श्रम त्रिदंडी होता आणि यतिधर्म हा काय-मचा आहे, ही गोष्ट ते विसरले. परिणाम असा झाला की, सत्तेला वेळोवेळी जरब दाखविणारे हे यती सत्तेचे पहारेकरी बनून राहिले आहेत असे भासू लागले. खरे म्हणजे देवरसांची गाजून राहिलेली अहमदाबादची ताजी मुलाखत ही संघप्रमुखांनी– पहिल्या शिट्टीचा परिणाम न झाल्याने वाजविलेली दुसरी शिट्टी आहे असे म्हटले पाहिजे.

### भांबावलेला यतिधर्म

परंतु तसे म्हणता येत नाही, याचे कारण देवरसांनी इंदिरा-काँग्रेसशी सहकार्य कर-ण्याची बिचकत-बाचकत दाखविलेली तयारी. आजपर्यंत 'संघ आता बदलला आहे, त्याच्याशी हातमिळवणी करण्यास हरकत नाही' असे समाजवादी स्वत:ची समजूत काढण्यासाठी म्हणत असत, 'इंदिराबाई बदलल्या आहेत. त्यांच्याशी सहकार्य करण्यास हरकत नाही' असे आता देवरस म्हणतात. समाजवाद्यांची बावळट म्हणून टिंगल होत आलीच आहे. बाळासाहेबांवर ती वेळ येणार नाही अशी अपेक्षा आहे. इंदिरा काँग्रेसशी सहकार्य करण्याचे दुसरे कारण श्री. देवरस असे देतात की, संघाचे ध्येय आणि इंदिरा काँग्रेसचे ध्येय एकच आहे धार्मिक ग्रंथ आणि पोथ्या यांच्यातून कर्मकांडापासून आधुनिक वैज्ञानिक शोधांपर्यंत सर्व गोष्टींचे पुरावे शोधणाऱ्याला सापडतात. संघाच्या ध्येय-धोरणाची तशी स्थिती नव्हती आणि अज-नही असणार नाही असे वाटते ! इंदिरा– काँग्रेसशी सहकार्य करण्याविषयी देवरसांनी जे सांगितले आहे ते इतक्या चाचपडत्या स्वरूपाचे आहे की त्याची फारशी गांभीर्याने दखल घेण्याची जरुरी नाही.

मग श्री. देवरसांना हे का करावे लागले? आम्हाला तरी याचे कारण असे दिसते की, ज्या यतिधर्माचा उद्घोष करीत संघ ७७ मध्ये राजकारणात उतरला तो यतिधर्म त्याला पेलवला नाही. देवरसांच्या पहिल्या शिट्टीकडे कार्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले. ते राजकारणातच राहिले. राजकीय परिस्थिती ताळ्यावर आली नाहीच उलट संघाच्या लाठ्या मात्र सत्तेच्या कडीकोयंडचात अडकून राहिल्या. राजकारणात उतरणे सोपे आहे, बाहेर पडणे जवळपास अशक्य आहे.

देवरसांची मुलाखत ही स्वयंसेवकांसाठी दुसरी शिट्टी आहे आणि इंदिरा काँग्रेसकडे पसरलेला सहकार्याचा हात ही सत्तेच्या कडचा-कोयंडचात अडकलेल्या त्यांच्या लाठ्या सोडविण्यासाठी चाललेली धडपड आहे. संघाविषयी आस्था असणाऱ्यांनी देवरसांची मुलाखत तारतम्याने वाचून त्यांचे उद्दिष्ट सफल व्हावे अशी सदिच्छा बाळगली पाहिजे. बिकट परिस्थितीत आग्र्याची वारीही करावी लागते.

परंतु देवरसांच्या या कसरतीतून संघ-प्रेम्यांनी हाही धडा घेतला पाहिजे की, यति-धर्म ही फोल कल्पना आहे. राजकारणाबाहेर राहून आणि वेळोवेळी राजकारणात हस्तक्षेप करून राजकीय परिस्थिती ताळ्यावर आणता येईल ही फसवणूक आहे. तो यतिधर्म न राहता त्रिदंडी राजधर्म होतो. त्याने ना राज-कारण साधते ना यतिवर्गाचे पावित्र्य राहते. ☐


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# आंतरराष्ट्रीय गोसंमेलन

मूळ लेखिका : शकुंतला परांजपे
अनुवादक : डॉ. शरद अभ्यंकर

(राज्यसभेच्या अधिवेशनाकरता मी दिल्लीला जात होते. पहिल्याच दिवशी गोवधबंदीची मागणी करणारा एक मोर्चा तिथे यायचा होता. माझ्या डोक्यात गायींनीच ठाण मांडले होते. तेवढ्यात मला डुलकी लागली आणि अचानक मी एका आतरराष्ट्रीय गोसंमेलनातील प्रेक्षकाच्या गॅलरीत बसलेली आढळले. या संमेलनातील काही भागाचा हा वृत्तात.)

**ऑस्ट्रेलियन गाय** : जगातील निरनिराळ्या देशातून आलेल्या तुम्हा गोभगिनींचे या पहिल्याच आतरराष्ट्रीय गोसंमेलनासाठी माझ्या ऑस्ट्रेलिया देशात स्वागत करताना मला फार आनंद होत आहे. हा देश नवीनच असून इथे खूप मोठ्या मोकळ्या जागा आहेत आणि सुदैवाने आपली वंशवृद्धी करणे इथल्या माणसांना कठीण जात आहे. हे असंच कायम चालू राहो अशी मी इच्छा प्रदर्शित करते. इथल्या माणसानी त्याच्याच भल्याकरता परक्या नागरिकाच्या प्रवेशावर कडक निर्बंध घातले आहेत. ' गोऱ्याकरिताच ऑस्ट्रेलिया ' या त्यांच्या धोरणामुळे, आशियातील प्रचंड लोकसंख्येच्या देशातून इथे माणसाचे लोंढे येण्याची शक्यता राहिलेली नाही. त्यामुळेच आम्हा ऑस्ट्रेलियातील गायींना आमच्या समृद्ध कुरणातून माणसाकडून आमची हकालपट्टी होण्याची भीती अजिबात वाटत नाही. भारतासारख्या काही देशात मला असे समजते की, जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्याच्या धोरणामुळे तिथल्या बिचाऱ्या आमच्या भगिनींना गवताचे एखादे पाते मिळणेही दुरापास्त झाले आहे.

या ठिकाणी आपण आपले निरनिराळे (विशेषतः मानवनिर्मित) प्रश्न आणि त्यावरील उपाय यांचा विचार करण्याकरता जमलेल्या आहोत. पण ऑस्ट्रेलियन गायींचे प्रश्न आपल्यापुढे माडण्यापूर्वी, मला हे जाहीर करायला आनंद होत आहे की, आपल्या भारतीय गोभगिनीने या प्रथम आतरराष्ट्रीय गो–संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचे मान्य केले आहे. आपणा इतर कोणत्याही गायींना न मिळणारा आदर भारतात हिच्याबद्दल दर्शविला जातो, इतका की तिचे दूधच काय मूत्रसुद्धा अमृत म्हणून तिथे प्राशन केले जाते. आम्हीही तिच्याबद्दल आदर व्यक्त करतो आणि तिच्या पुरातन ज्ञानाचा आणि देवत्वाचा फायदा आपल्याला लाभेल अशी आशा व्यक्त करतो. अमेरिकेतील त्या संपत्ती आणि समृद्धीमय महान देशातील गोभगिनी या ठरावाला अनुमोदन देईल. त्यापूर्वी काही सूचना. चीनमधील आपल्या भगिनींना या संमेलनासाठी प्रतिनिधी पाठवण्याची मी विनंती केली होती, पण आजतागायत त्यांचेकडून उत्तर आलेले नाही.

आयर ऊर्फ आयर्लंडमधील आपली प्रतिनिधी भगिनी आजच प्रसूत झालेली असून तिने एका सुरेख खोडाला जन्म दिला आहे. त्यामुळे ती आज सकाळच्या अधिवेशनाला हजर राहू शकत नसली तरी दुपारी किंवा उद्याच्या सत्राला मात्र अवश्य येणार आहे. आपल्या बछड्याचे नाव तिने ' ऑस्ट्रेलिया ' असे ठेवले आहे.

अर्जेंटिनामधील आपल्या भगिनीने अगदी आयत्या वेळी येण्याचे रद्द केले. कारण तिथे फऱ्या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झाला आहे आणि आपणामध्ये या रोगाची लागण होऊ नये अशी तिची मनापासून इच्छा आहे. खरोखर केवढा पशुतुल्य मनाचा मोठेपणा !

स्वागतसमितीची अध्यक्षा या नात्याने मी हेही जाहीर करते की, आमच्या समितीने काही वृषभमंडळींनाही या समारंभात निरीक्षक म्हणून आमंत्रित करण्याला मान्यता दिली आहे. संमेलनाच्या अध्यक्षा, आपले कामकाज संपल्यावर, त्याना योग्य वाटल्यास या मंडळींना त्याचे प्रश्न माडण्याची संधी देऊ शकतील. अनेक प्रतिनिधींना या संमेलनात भाषणे करावयाची असल्याने, मी माझे निवेदन आत्ताच उरकून घेते, म्हणजे पुन्हा तुमचा वेळ जायला नको.

## चैनीत राहतो

अगदी सुरुवातीपासून सुरुवात करायची म्हणजे गोरा माणूस जसा या ऑस्ट्रेलिया खंडात उपरा तशाच आम्ही गायीही इथे उपऱ्याच. सुरुवातीला इथे कैद्यांची वसाहत होती. त्यावेळी त्यांचे ( किंवा खरे म्हणाल तर त्याचेवर देखरेख करणारांचे ) उपयोगाकरता इंग्लंडहून इथे चार गायी आयात करण्यात आल्या. अशाच वरचेवर आयात केलेल्या आणि मग त्याच्या वंशवृद्धीतून जन्माला आलेल्या अशाचा आमचा आता या दक्षिण गोलार्धात मोठा आकडा झाला आहे. आमच्या वंशाचे दुहेरी महत्त्व आहे, हे तुम्ही जाणताच. राष्ट्रीय संपत्तीत अत्यंत मोलाची भर आम्ही दोन मार्गांनी घालत असतो. १ : दूध, लोणी, मलई, चीज इ. दुभत्याचे पदार्थ २ : गोमास, चामडे आणि इतर उपपदार्थ. फार काय इथला वराह व्यवसायसुद्धा आमच्या मलई काढलेल्या दुधावर चालतो.

आमची जोपासना आणि वंशवृद्धी इतक्या काळजीपूर्वक करण्यात येते की, आजकाल सर्वसाधारण दुभती गाय वर्षाला ४०० गॅलन ( २००० लिटर ) दूध देऊ शकते. ( आकडे ७० पूर्वीचे ) हिरवीगार कुरणे खास आमच्याकरता खतपाणी करून वाढवली जातात. या खतात आम्हीही भर टाकीतच असतो. दर एकरी किती गायी

असाव्यात याचे निर्बंध असल्यामुळे उगाच गायसंख्या भरमसाट वाढत नाही. सर्व प्रकारच्या रोगांपासून बचाव करण्याकरता प्रतिबंधक औषधोपचार आणि इंजेक्शने आम्हाला दिली जातात. दिवसाचे २४ तास आणि वर्षाचे ३६५ दिवस आम्ही उघड्यावरच वावरतो आणि दोहन करण्याकरता आपण होऊन गोठ्यात जातो. ह्याचं काय आहे की, आमच्या कासा दुधाने इतक्या ओतप्रोत भरतात की दोहन केल्यावर जरा आराम वाटतो. आम्हाला स्नानाकरता आणि दोहनाकरता आरोग्यपूर्ण यंत्रसामग्री वापरली जाते. त्यामुळे मानवी गलिच्छ हाताचा स्पर्शही आमच्या शरीराला वा सडांना होत नाही औषधोपचार, विशेष आहार, प्रसुतीपूर्व व प्रसुतीउत्तर चिकित्सा आम्हाला उपलब्ध असतात. एकमेकींना इजा होऊ नये म्हणून आमचे शृंगनिर्हरण केले जाते युद्ध काळात आम्ही दोस्त सैन्यांची पोटे भरण्याची कामगिरी बजावली आजसुद्धा आमच्या दुधाची भुकटी, विकसनशील देशातील लक्षावधी अर्धपोटी बालकांना पौष्टिक आहार म्हणून उपयोगी पडत आहे चर्मोद्योग आणि अस्थिखत उद्योग हे आमच्यामुळेच भरभराटीला येतात; कारण आमचा कुठलाही भाग वाया असा जातच नाही. आमची देखभाल आणि उपयोगिता याबाबतीत मानवाने आपल्या बुद्धीचा निश्चितच कमाल वापर केला आहे. आम्ही अत्यंत चैनीत राहतो आणि भरपूर आहार घेतो. किंबहुना ऑस्ट्रेलियन माणसाप्रमाणे जास्तच आहार घेतो. पण यातही एक गोम आहे. मानव हे सर्व का करतो ? तर त्याला भरपूर खायला आणि चैनीत रहायला मिळावे म्हणून. आमच्या बालकाला जन्म दिल्यावरसुद्धा आम्हाला आमच्या वछड्याला पाजण्याचा मातृसिद्ध हक्क नाकारला जातो. अर्थात या वछड्यांची उत्तम काळजी घेतली जाते. पण त्यातून उत्तम दूध देणाऱ्या गायी किंवा उत्तम मांस देणारे खोड तयार व्हावेत हाच हेतू असतो. ज्या आम्ही आतापर्यंत हजारो गॅलन दूध दिलेले असते त्यांनाही भाकड होताच, कमी श्रेणीचे गोमास मिळवण्याकरता ठार केले जाते. तर बंधूभगिनींनो, ही आहेत आमची गाऱ्हाणी. आपणा सर्वांची सामुदायिक गाऱ्हाणी म्हणायला हरकत नाही. अपवाद आहे फक्त आपल्या सूचित अध्यक्षा भारतीय गायीचा. तिथे गोहत्या हे पातक मानतात आणि आता तर कायद्याने गुन्हा मानला जाणार आहे. भारतीय गायींना मिळणाऱ्या आत्यंतिक आदराचा आम्हाला हेवा वाटतो. कारण आमचा ऑस्ट्रेलियन माणूस जरी आमच्या दुधामांसावर पुष्ट होत असला तरी आमचे नावही शिवीसारखे वापरतो. एखाद्याची ' गाय ' या शब्दाने संभावना करणे हे ऑस्ट्रेलियन शब्दकोशात तुच्छतम मानले जाते. अर्थात हा थोडाफार राष्ट्रीय प्रश्न आहे, आतरराष्ट्रीय नव्हे, पण विचारात घेण्यासारखा आहे. आमच्या अमेरिकन भगिनीने अध्यक्षीय सूचनेला अनुमोदन द्यावे अशी मी विनंती करते.

**अमेरिकन गाय :** प्रतिनिधी आणि निरीक्षक सुहृदहो, या आंतरराष्ट्रीय गोसंमेलनाचे अध्यक्षस्थान आमच्या भारतीय भगिनीने भूषवावे या सूचनेला मी अत्यंत आनंदाने दुजोरा देत आहे प्रथम मी स्वतः माझ्या देशातर्फे या संमेलनाचे यजमानपद पत्करल्याबद्दल ऑस्ट्रेलियाचे अभिनंदन करते आणि अशीच अनेक अधिवेशने इथे होतील अशी आशा करते पाश्चात्त्य संस्कृतीच्या दृष्टीने विचार केल्यास ऑस्ट्रेलिया हा सर्वांत नवीन देश म्हणावा लागेल.; पण या इथे आल्यावर या देशाने केलेली प्रगती पाहून मी थक्क झाले आहे. आम्हाला सावध राहिले पाहिजे नाहीतर हा देश आमच्याही पुढे जायचा.

मित्रहो, मला हे स्पष्टपणे कबूल करू दे की, आमच्या चीनमधील भगिनींना पाठवलेल्या निमंत्रणाचे उत्तरही आले नाही, याचे मला थोडेही आश्चर्य वाटत नाही. काम करण्याची किंवा न करण्याची त्याची तशी पद्धतच आहे किंवा असेही असेल की,' आपले निमंत्रण तिथल्या मानवी राज्यकर्त्यांच्या (त्यांना मानवी म्हणता आले तर) हातात पडले असावे आणि मग योग्य पत्त्यावर पोचलेच नसावे. ते काही का असेना, मी असे ऐकते की, गाईचे दूध हे चीनमध्ये मानवी दयादुग्धाइतकेच दुर्मिळ आहे. तिथे बैलाऐवजी गाईलाच नांगराला जुपतात. कदाचित् बायकांनाही जुपत असावेत. आमचे मास आणि त्याचे विविध चवदार प्रकार हेही तिथे दुर्मिळ आहेत, चिनी लोक डुकरापासून झुरळापर्यंत सर्व भक्षण करतात. एकमेकांचे भक्षण करत नाहीत हेच आश्चर्य. तसे केले तर बरेच प्रश्न सुटतील त्यांचे.

## तज्ज्ञ सल्ला-सेवा

असो. आता थोड्या आनंददायक विषयाकडे वळते. इतर विकसित देशाप्रमाणेच अमेरिकेतही आमच्या वंशात गेल्या काही दशकात ओळखू येणार नाही इतक्या सुधारणा घडवण्यात आल्या आहेत. कशा ? तर माणसाने आपले अत्याधुनिक तंत्रज्ञान या वंश सुधारणेकरता पूर्णपणे वापरले आहे. निवडक जोपासना, संकरित जोपासना, काळजीपूर्वक जोपासना यामुळे तमाम गोवंश उच्चश्रेणीवर पोचला आहे. आपल्या स्वतःच्या वंशाची अशी सुधारणा करण्याकरता माणूस आपले तंत्रज्ञान वापरत नाही हे केवढे दुर्दैव ! आमचे वजन, आकार, मांसक्षमता, दुग्धक्षमता सर्व काही वाढले आहे. विशेष म्हणजे दुभत्या गायींची संख्या आमच्या देशात कमी झाली असूनही एकूण दुधाचे उत्पादन वाढले आहे. म्हणजेच एका गाईपासून मिळणारे दूध वाढले आहे. या देशातील सर्व वयाची मंडळी आइस्क्रीमचे डोंगरच्या डोंगर फस्त करताना पाहून आश्चर्य वाटते

तज्ज्ञसल्ला-सेवा हे आजच्या युगाचे वैशिष्ट्य आहे आणि आमच्या जन्माच्या पहिल्या दिवसापासून ही सुरू होते. जन्मल्याबरोबर काळजीपूर्वक तपासणी, नंतरचे काही दिवस बारकाईने निरीक्षण, वंशाचा इतिहास, यानुसार नवजात बछड्याची पाचपैकी एका लिंगवर्गात नोंदणी होते. कारण विश्वास ठेवा अथवा ठेवू नका, आमच्याकडे गोवंशाचे पाच प्रकारे लिंगभेद केले जातात.

१ : स्टिअर ( लहानपणीच निर्बीजीकरण करून मांसाकरता वाढवलेला खोंड) २ : स्टॅग (जवळजवळ पूर्ण वाढ झाल्यावर निर्बिजीकरण केलेला बैल) ३ : हैफर–कालवड. ४ : दुभती गाय आणि ५ : जातिवंत बैल.

माझा वेळ संपत आला आहे; पण अध्यक्षाबद्दलच्या सूचनेला अनुमोदन देताना तुम्हाला सर्वांना आणि आपल्या अध्यक्षा यांनाही गमतीची वाटेल अशी एक गोष्ट सागते. ती म्हणते आमच्याकडे ब्राह्मण गाय नावाची एक जात असते. तिच्या पाठीवर डौलदार वशिंड असते.

प्रतिनिधी सुहृदहो, फक्त आणखी काही मिनिटांत मी आपल्या

यजमान प्रतिनिधींनी मांडलेल्या गाऱ्हाण्याबद्दल माझे विचार मांडणार आहे. त्यांची पहिली तक्रार अशी होती की, जन्मल्यापासून २४ तासांचे आत आपली वासरे आपल्यापासून तोडली जातात. त्यात काय एवढे ? मानवी आयाचेच पहा ना. आपले देहसौंदर्य बिघडू नये म्हणून त्यातल्या बहुतेक सर्वजणी लवकरात लवकर मुलाला तोडण्याच्या विचारात असतात. आता त्यातल्या बऱ्याच-जणींच्या मध्ये तोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण मुळात त्यांना दूधच नसते. आपली वासरे दूर देऊन त्यांची उत्तम देखभाल केली जाते, असे या आयाच्या बाबतीत केले तर त्या काय खूश होतील ? पोर वाढवायचा त्रास वाचणे म्हणजे काय साधी गोष्ट आहे ? आता आपल्या गरीब वासरांच्या मानाने ही मानवी पोरटी वाढवायला भलतीच तापदायक असतात ही गोष्ट खरी; पण त्यांची काळजी घेतली जात आहे आणि आपल्याला कधीही जमली नसती अशी त्याची देखभाल केली जात आहे, या एकाच विचाराने आपण या वियोग दुःखाला खंबीरपणे तोंड देऊन वासरांच्या सुखातच आपले सुख मानले पाहिले.

आपल्या ऑस्ट्रेलियन मैत्रिणीने आणखी एक तक्रार सांगितली की, माणूस त्याच्या उपयोगाकरताच आपली योग्य काळजी घेतो. हे अगदी खरे आहे; पण त्यात राग येण्यासारखे काय आहे ? स्वतः-पेक्षा आपल्या मालकीच्या वस्तूंचीच माणूस नेहमी जास्त काळजी घेतो. माणूस नसता तर आपली एवढी वाढ झालीच नसती. शेवटची तक्रार होती की, माणसाकडून भक्षण होण्याकरता आपल्याला मारण्यात येते. समजा असे मारणे बंद केले, तर काय आपण चिरंजीवी होणार आहोत ? अमर होणार आहोत ? नाही गं बायांनो, शक्यच नाही आणि मग आपल्याला मरण येईल ते कसे ? तुम्हाला तसे मरण बरे वाटेल का सध्या आहे तसे झटक्यात वेदना-रहित मरण बरे वाटेल ? माझ्याच देशात माणसाने फाशीच्या खांबाची पुराणी पद्धत बंद करून विजेच्या खुर्चीचा शोध लावला. आपल्याकरताही जास्तीत जास्त वेगवान आणि वेदनारहित मृत्यू येण्याचे त्याचे प्रयत्न चालूच असतात. मेलं हे आपल्याला पाहिजेच. मग उत्तम प्रकारे जगून चटकन मेलेलं बरं नाही का ? वेदनापूर्ण आणि असाध्य अशा दुखण्यांनी बेजार झालेल्या अनेक स्त्रीपुरुषांना सुद्धा आपल्या भाग्याचा हेवा वाटत असेल. दयामृत्यू वगैरेबाबत आजकाल बरीच चर्चा चालते; पण या अखंड चर्चेतून अर्थपूर्ण असे काहीं निष्पन्न व्हायला युगे लोटतील. हल्ली आत्महत्या हासुद्धा गुन्हा मानतात. तेव्हा मी तर माणसाला त्याच्या कार्याबद्दल दोष देण्याऐवजी त्याच्या दयाळूपणाबद्दल त्याचे आभार मानीन.

**डेन्मार्कची गाय :** आपल्या भारतीय भगिनीला या संमेलनाचे अध्यक्षस्थान देण्याच्या ठरावाला मीही अनुमोदन देत आहे. आता पर्यंतच्या दोनही वक्त्यांची भाषणे मी लक्षपूर्वक ऐकली आणि प्रत्येकीचे म्हणणे मला योग्य वाटते, इतके त्यांचे वक्तृत्व प्रभावी आहे. मी एका लहान देशातून आले आहे आणि आमची भाषा वेगळी असल्यामुळे इंग्रजी माझे जरा कच्चेच आहे. माझा देश लहान असला तरी तिथल्या दुग्धव्यवसायाकरता तो प्रसिद्ध आहे. सर्व युरोपात आपल्या देशातून होणारी दुग्धजन्य पदार्थांची निर्यात सर्वोच्च आहे आणि निर्यातीवरील निर्बंधात सूट मिळेल याकरता आमचा देश राष्ट्रकुलात सामील होण्याच्या विचारात होता.

दुसरे युद्ध होणार हे ओळखून डॅनिश शेतकऱ्यांनी त्यांचे वराहधन आणि गोधन वाढवण्यास सुरुवात केली. अगदी शत्रूच्या अमलाखाली सुद्धा आमच्या पशुधनाची संख्या फक्त ४ टक्क्यांनी घटली. यावरून डॅनिश शेतकरी पशुपालनामध्ये कसा तरबेज आहे हे सिद्ध होते. उन्हाळ्यात आम्ही भरपूर खते देऊन जोपासलेल्या कुरणातून चरत रहातो, आणि हिवाळ्यात आम्हाला गारठा बाधू नये म्हणून खास आहार देण्यात येतो. आमचा देश फार सुखी आहे आणि खाली बसण्यापूर्वी मला माझ्या अमेरिकन मैत्रिणीला एक गोष्ट सांगायची आहे. ती म्हणजे स्कँडिनेव्हियापैकी एका देशात (स्वीडनमध्ये) आत्महत्या हा गुन्हा नाही.

## वृषभव्यथा

**अध्यक्ष :** माझ्याबद्दल आपण सर्वांनी जे गौरवोद्गार काढलेत त्याने माझे हृदय भरून आले आहे. या वैशिष्टयपूर्ण संमेलनाचे अध्यक्षस्थान मला देऊन आपण माझा मोठा सन्मान केला आहे

माझ्या अध्यक्षीय भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी इथे आलेल्या आपल्या बंधूंना त्यांचे काही विचार मांडण्याची आणि गाऱ्हाणी असल्यास ती सांगण्याची आपण परवानगी द्यावी. आपल्या देशात नेहमीच पुरुषांना स्त्रियांच्या आधी मान दिला जातो, त्यामुळे मी त्यांना संधी देत आहे. शिवाय आपले म्हणणे मांडल्यावर त्यांना सभा सोडून जावेसे वाटल्यास तशीही मी परवानगी देते. तसे त्यांनी करावे असे मी सुचवत नाही; पण बायकांच्या बडबडीचा पुरुषांना नेहमीच कंटाळा येतो. आता आपले बंधू खोंड (steer) प्रथम बोलतील.

**स्टीअर (बडवलेला खोंड) :** पुरुषांचे विचार मांडण्याकरता मला प्रथम संधी दिल्याबद्दल, मी अध्यक्षामहोदयांचे आभार मानतो. प्रश्न एवढाच आहे की, आम्हाला पुरुष तरी का म्हणायचे ? कारण वयात येण्यापूर्वीच आमचे खच्चीकरण केलेले असते. काही आठवड्यात किंवा फार तर चार पाच महिन्यात ही प्रक्रिया केली जाते. कारण त्याशिवाय उच्च दर्जाचे, मऊसूत, सुरेख स्वादाचे, रंगाचे आणि स्पर्शाचे वृषभमांस तयार होऊ शकत नाही. काही एक मौज मजा न करता 'निष्काम' आयुष्य आम्हाला घालवायला लावण्यात माणसांना काहीही दिक्कत वाटत नाही. अणुऊर्जेशी भलते खेळ खेळणारा हा माणूसही असाच निर्बीज होईल आणि त्याचा निर्वंश होईल असा मी शाप देतो. धन्यवाद.

**स्टॅग (बडवलेला बैल) :** निरीक्षक म्हणून काही विचार इथे मांडण्याची संधी दिल्याबद्दल, बाईसाहेब, मी आपला आभारी आहे. आपल्या जातीची गाऱ्हाणी बरीचशी माझ्याआधी बोललेल्या वक्त्यांच्याप्रमाणेच आहेत. त्यांच्याप्रमाणे आम्ही दुःखपूर्ण आणि एकाकी जिणे जगत असतो. किंबहुना त्यांच्याहूनही थोडे जास्तच. कारण पूर्णपणे वयात आल्यावर आपले खच्चीकरण करण्यात येते. लैंगिक आकर्षणाची मस्ती अंगात खेळू लागते न लागते तोच त्याच्या पूर्तीकरणाची सामग्री आपल्याकडून दुष्टपणे हिरावून घेतली जाते. आणखी काय बोलणार...पण एक गोष्ट बोलतोच कदाचित जाति-वंत बैल होण्याच्या अपेक्षेने आमची वाढ करण्यात येत असेल आणि

आम्ही त्या पदाला पात्र न ठरल्यामुळे नाकारले जात असू. ठीक आहे. आम्ही पात्र न ठरलो तर आमची फक्त 'नसबंदी' करावी. माणसात हल्ली ही फार प्रचारात आहे. खच्चीकरण करून आमच्या जीवनातला आनंद हिरावून घेण्याचे काय कारण ?

बैल : अध्यक्षा ताईसाहेब, माझ्या जातीचे प्रश्न माडण्यापूर्वी मी तुमच्या देशात पुरुष जातीला दिल्या जाणाऱ्या सन्मानाबद्दल तुमचे अभिनंदन करतो. आम्ही मात्र खरोखरीचे पुरुष म्हणता येईल असेच असतो माझ्याआधी बोललेल्या माझ्या इतर दोन बंधूचे नैसर्गिक अधिकार हिरावून घेऊन आम्ही जातिवंत बैल मंडळी आयुष्यभर मजा मारतो. प्रजोत्पत्ती हेच आमचे काम. अत्यंत परिपूर्ण अशा चाचण्या आणि जोपासना यातूनच आमच्यापैकी निवडक काहीचीच या कामाकरता निवड होते. आमचा प्रत्येकाचा जनानाही मोठा असतो. माणसातील पुरुषांनासुद्धा, मला खात्री आहे, आमच्या भाग्याचा हेवा वाटत असेल. पण माझ्या सुदर मैत्रिणीनो, आमच्यावर लवकरच दु:खवस्था प्रसंग ओढवणार आहे. दिवसेंदिवस कृत्रिम गर्भधारणेचे तंत्र जास्त जास्त प्रसार पावत आहे. त्यामुळे आमचा निसर्गदत्त आनंद हिरावून घेतला जात आहे. हा म्हणे फार क्रांतिकारी शोध समजला जातो. तसे असेल तर माणसाने आपला वंश सुधारण्याकरता त्याचा वापर करावा, आणि आम्हाला निसर्ग नियमानुसार गोवंशाची सेवा करू द्यावी. माझ्या प्रिय मैत्रिणीनो मी व्यक्त केलेल्या या भीतीचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार कराल याची मला खात्री आहे. कारण तुमच्याही आनंदाशी हा प्रश्न संबंधित आहे. धन्यवाद.

## समारोप

अध्यक्षा : आपले विचार व्यक्त केल्याबद्दल आपल्या बंधूची मी आभारी आहे. आता माझी पवित्र कहाणी ऐका. मी थोडक्यात आवरणार आहे आणि तसे आवरायलाच हवे. कारण चार पायांवर दीर्घकाल उभे राहण्याचीसुद्धा माझ्यात आता शक्ती नाही. आठवण असू द्या, की अन्नटंचाई असणाऱ्या देशातून मी आलेली आहे आणि ही अन्नटंचाई कायमची रहाणार की काय अशी मला भीती पडली आहे. माझ्याभोवती आमच्या देशात निर्माण करण्यात आलेले तेजोवलय आणि मला देण्यात आलेलं देवता स्वरूप यामुळे तुम्ही लोक फार प्रभावित झालेले दिसता. माझ्या देशात देव मुबलक आहेत; पण दुर्मिळ आहे. काही काळापूर्वीच आमच्या देवाची संख्या देशातल्या लोकसंख्येपेक्षा जास्त होती. पण हे देव नशीबवान म्हणायचे. कारण ते खातपीत नाहीत. पण आता गो-देवतांना मात्र शरीर जिवंत राखण्याकरता खाणंपिण भाग असते. आमची संख्या आहे २० कोटी किंवा तुमच्या पद्धतीत सागायचं तर २०० मिलियन. आता साधं गणित माडा, ५०० मिलियन माणसांनाच आताच दुर्भिक्ष्य भेडसावत असताना, आम्हाला कुठलं पुरेसं खायला मिळणार ? आमचे देशबांधव एका हातात झोळी आणि एका हातात कटोरा घेऊन जगभर पैशाची आणि अन्नाची मदत मागत फिरताहेत आणि तरीही गोवधबंदीच्या मागणीसाठी चळवळी करताहेत.

आमच्या देशात गोवध लोकाना चालत नाही. पण गाय उदास पडून हळूहळू मेली तर चालते. आमचा उपयोग संपला की आम्हाला मोकाट सोडून देतात. चारापाण्याच्या शोधात आम्ही रानोमाळ हिंडत राहतो आणि अस्थिपंजर होऊन जातो. अशातच काही कमअस्सल बैल आमच्यावर अत्याचार करतात आणि आमच्या दु:खात भर घालतात. आणि प्रजा आमच्यासारखीच गचाळ निपजते. कावळे आणि गिधाडे आमच्यावर टोची मारू लागतात. कित्येकदा ते आमचे डोळे उचकटून काढतात; पण त्यांना हाकलण्याकरता शेवटी उडवायचीदेखील ताकद आमच्यात नसते. अशा रीतीने बिचाऱ्या गोमातेचा अंत होतो. आमचे उरले सुरले मांस कोल्ही, कुत्री ओरबाडून खातात, उंदीर, घुशी आमचे कातडे कुरडतात. आणि आमच्या अस्थी उन्हातान्हात कुजून जातात. पण आम्हाला मारणे हे मात्र पातक समजले जाते. गोवधबंदीकरता चळवळ करणाऱ्याना माझे कळकळीचे सांगणे आहे की, त्यांनी प्रत्येकाने एक एक गाय पाळून तिची काळजी घ्यावी. म्हणजे ही गोष्ट किती कठीण असते याचा त्यांना अनुभव येईल. माझ्या तीन बहिणीनी सागितलेले दूध उत्पादनाचे आणि खपाचे आकडे मी ऐकले. आमच्याकडची सरासरी दर गायीमागे २ पिंट (१ लिटर) आहे. आणि खप दरमाणशी रोज अदपाव लिटर सुद्धा नाही.

या तीन भगिनीनी सांगितलेली पशुसंवर्धनाची उत्कृष्ट पद्धती ऐकून मला मी इथे येण्यापूर्वी एका सनातन हिंदू महिलेने नाखुषीने काढलेल्या उद्‌गारांची आठवण झाली ती म्हणते 'गोभक्षकच खरा गोरक्षक आहे !' तिची मुलगी कॅनडात शिकत होती आणि तिथल्या पशुसंवर्धनाची माहिती तिने पत्रात लिहिली होती. आपल्याकडे संस्कृतमध्ये 'जीवो जीवस्य जीवनं' अशी म्हण आहे. त्यानुसार आपल्या देशात बकऱ्या, मेंढ्या, कोंबड्या याची सर्रास हत्या करण्यात येते. पण गाय मला पवित्र आहे. तिची हत्या म्हणजे मातेचीच हत्या, तिला मरणयातना सोसत जिवंत ठेवले तरी काही बिघडत नाही. पण सुरी तिच्यावर चालवता कामा नये. म्हणजे काही भारतीय माणूस आमच्याशी दयाबुद्धीने वागतो असा नव्हे. आमच्या कासेतून दुधाचा थेंब न थेंब पिळवटून काढण्याकरता काय काय प्रकार करतात हे मी तुम्हाला सागितले तर तुम्ही बेशुद्ध पडाल. म्हशीही आपल्याकडे दुभत्या जनावरात मोडतात. त्याचे दूध जास्त स्निग्धांश असणारे असते. पण म्हशीच्या टोणग्याचा काहीच उपयोग नसतो आणि वासराशिवाय म्हैस दूध देऊ शकते, म्हणून ही वासरे अन्नपाण्यावाचून तशीच मरू दिली जातात. म्हणजे आईचे सगळेच्या सगळे दूध काढून विकता येते. हा काय दयाळूपणा झाला ? आमच्या देशातील आणखी एकच क्रूर पद्धती सागते. काही एक अन्नपाणी न देता नुसत्या आंब्याच्या पानावर गायीला राहू दिले तर तिच्या मूत्रापासून एक महागडे रंगद्रव्य मिळते. पण अशी गाय अन्नपाण्यावाचून फार दिवस जगत नाही आणि तडफडून मरते. पण म्हणून काय झाले ? ही काही गोहत्या नव्हे ! गाय म्हणजे देवाची माता, तिला मारून कसे चालेल ? मग त्यामुळे ती जास्त हालअपेष्टात जगली आणि वेदना असह्य होऊन मेली तरी चालते. तिला इतके पवित्र मानल्याबद्दल एवढी किंमत तिथे मोजायलाच हवी. ▪

श्रीमती इंदिरा गाधी पंतप्रधान झाल्यामुळे गोवधबंदी, दारूबंदी यासारखी फॅडे मागे पडतील अशी आशा आहे. ही मागे पडणे का

योग्य आहे हे दर्शविण्याकरता वरील लेख भाषांतरित केला आहे. तरीही हा लेख वाचून कोणी सनातनी मंडळी अशा शंका घेतील,की इतके आहे तर आमच्या पूर्वजांनी गाय ही देव आहे, तिला मारणे हे पाप आहे असे दंडक का घातले असतील ? त्यातले वैयर्थ काही लोकांना तरी पटले असेल, तरीही हजारो वर्षे ही परंपरा का चालत आली ? त्याअर्थी त्यात काही तरी आपल्याला; अज्ञात असे महत्त्वाचे कारण असलेच पाहिजे. आणि हे कारण उमजत नाही तोपर्यंत सर्रास गोहत्या करण्याचा धोका का पत्करावा ? या शंकाची आधीच उत्तरे देण्याचा प्रयत्न करतो.

*प्राचीन काळी आर्य लोक भटक्या वृत्तीचे होते त्यावेळी गायींचे* कळपच्या कळप घेऊन नवीन नवीन कुरणे शोधत फिरत असत. त्यावेळी गो हे धन असले तरी गोवध 'निषिद्ध' नव्हता. 'बडा पाहुणा आल्यावर कोवळे वासरू मारावे' वगैरे गृहजीवन शास्त्रात शिकविले जात असे. नंतर ही मंडळी भारतात आली आणि शेती करू लागली. शेतीला बैलाचे महत्त्व फारच होते. आणि कितीही समृद्ध आणि सुपीक जमीन असली तरी निसर्गाच्या लहरीनुसार अधूनमधून अवर्षण पडतच असे. अशा अवर्षण समयी धान्य मिळत नाही म्हणून मासाशन करण्यासाठी सर्वत्र गोधन संपून गेले तर पुढे पाऊस पडूनही शेती करता येणार नाही आणि कायम उपाशी रहावे लागेल या भीतीने गोवधावर निर्बंध आणणे आवश्यक होते. आणि ते लोकानी पाळावेत म्हणून त्याला धर्माची जोड देऊन गायीत देवाना वस्ती करायला लावून, तिची हत्या हे ब्रह्महत्येतेपेक्षाही *महान पातक मानायला लावणे भाग पडले होते. आज या कल्पना* सोडून देऊन आधुनिक शास्त्रोक्त गोपालन आणि गोवंशाचे सु-प्रजनन हेच आपले कर्तव्य ठरते.

—अनुवादक

---

## बदलत्या कथा : [ ३ ]

# थेंब

वि. शं. पारगावकर

दिवाळीच्या काही दिवस अगोदर. एका तिन्ही सांजेस घरात भांडणे झाली. साडेसहा वाजेपर्यंत एक एक जण बाहेरून घरी आला होता. बापू तर सहसा घरीच असत. आई तर अंथरुणाला खिळलेली होती. मग येणारे म्हणजे कोण ? आम्ही सर्व भावंडं आणि गावातच सासर असलेली धाकटी बहीण. आई आजारी म्हणून ती नियमितपणे दुपारी येत असे.

सर्व जमले आणि घर भरून गेलं. जणू काही भांडणाकरिताच ते भरून गेलं होतं ! आणि मग वहिनीनं काही तरी कुभांड काढलं. कुभांड काढण्यात ती तशी फार पटाईत आहे. आणि काढलं ते माझंच म्हणजे झालं ! एक कुभांडखोर आणि दुसरा तिरसटराव. माझ्या स्वाभिमानाला, बाणेदारपणाला ते आव्हानच होतं. पाहता पाहता शब्द वाढू लागले आणि वादूही लागले.

बापू आपले शंभूचे अवतार. ते कधी कोणाच्या अध्यात नसत की मध्यात नसत; पण त्या दिवशी तेही आपल्या खोलीतून मधल्या दारात येऊन बसले असहाय होऊन प्रत्येकाकडे बघू लागले. मी वहिनीशी भांडत असता दुसरीकडे माझं बापूकडेही लक्ष होतं. प्रत्येकक्षणी असं वाटायचं की बापूंनी भांडणात भाग घ्यावा. इतकंच नव्हे तर माझी बाजू घ्यावी.

मी भांडण करतो तेव्हा माझी बाजू नेहमीच बरोबर असते. अगदी धर्मराजाचाच माझा पक्ष; पण बापूंना काय त्याचं. थोरला भाऊ तर आपल्या बायकोचीच बाजू घेणार! ती त्याला घ्यायलाच हवी. उभा संसार बायकोबरोबरच करायचा होता ना त्याला? बहीण तर काय धर्माधरची, तरी पण मनातून ती नेहमी माझ्या बाजूला असायची !

धाकटा भाऊ तर अगदीच लहान; म्हणजे बारा एक वर्षांचा. त्याला या भांडणात वगैरे काही स्वारस्य नसायचं. आणि त्याच्यात भांडणाचं इंद्रियही नव्हतं; पण मधूनच तो काही तरी बोलायचा. त्यात अनाहूतपणेच बाजू असायची माझीच ! पण त्याचं खरं कारण वेगळंच असायचं दूरवरून गावातून तो शाळेतून थकून घरी परतलेला असायचा. त्याला भूक लागलेली असायची घरात आई तर अंथरुणाला खिळलेली. वहिनीनं स्वैपाकाला लागायचं किंवा काही तरी खायला करून ठेवावं अशी त्याची अपेक्षा असायची; पण घरात ते तर काहीच नसायचं. उलट भांडणामुळे तर सारंच काही बदलून गेलेलं असायचं. म्हणून तो तडकायचा. त्याचा सरळ राग वहिनीवर असायचा.

आणि थोरल्या भावाला हे काही पसंत पडायचं नाही. त्याच्या बायकोनं दिवसभर काबाडकष्ट करायचे. कुणाला हवं नको ते बघायचं. आजारी सासूचं बघायचं. म्हाताऱ्या सासऱ्याचं बघायचं. आणि वर या साऱ्या भांडणाला तोंड द्यायचं. तेही ती एकटी एकीकडे आणि बाकीचे सारे एकीकडे !

आज तो फारच चिडला होता. आणि हिरीरीने भांडणात भाग घेत होता. आई एक घडकं अर्ध्या अंगावर टाकून भिंतीकडे तोंड करून पडली होती. तिचे डोळे मिटलेले होते; पण ती जागीच होती. ती हल्ली नेहमीच जागी असायची. क्वचित् दुखण्याची गुंगी चढलेली असली तरच जरा गुंगीत किंवा भ्रमात असायची.

ते काही थांबत नाही ते पाहिल्यावर तिने भिंतीवरची नजर समोर माणसाकडे वळविली. व्याकुळ दृष्टीने तिने एकदा सर्वांकडे पाहून घेतलं. आणि थोरल्या भावाकडे पाहून ती म्हणाली,

'अरे, तू या घरातला कर्ता माणूस ना?' आई असं जरी कोणाला उद्देशून बोलली तरी

तिचं बोलणं हल्ली पाहुण्या व्यक्तीसारखं वाटायचं !

'मग मी काय करू म्हणतेस आई? टाकून देऊ का हिला?'

'असं अभद्र काय बोलतोस!' आई व्याकुळ होऊन म्हणाली.

'पहिल्यादा तुमच्या या लाडक्या चिरंजीवांना आवरा?' वहिनी मोठाले डोळे करून माझ्याकडे पाहात फणकाऱ्यानं म्हणाली.

'कोणी माझं वकीलपत्र घ्यायची गरज नाही.' मीही तेवढ्याच तोलाचं उत्तर दिलं.

'आता तू गप्प बसायचं काय घेशील?' भाऊ.

'मी काय म्हणून गप्प बसणार? आई दिवसभर अंथरुणाला खिळून असते. आणि ही वहिनी तिच्या डोक्याशी अशी शेगडी फुलवून बसलेली असते!'

'आणि मी काय दिवसभर नुसती फुलं वेचीत बसलेली असते वाटतं? दिवस उगवल्यापासून मध्यरात्रीपर्यंत काबाडकष्टात मरत असते.'

'आणि आईनं तर सारं आयुष्य उन्हात वाळवत लावलं होतं. पाच सहा पोरांना जन्म दिला. त्यांना लहानाचं मोठं केलं. नवऱ्याच्या खस्ता खाल्ल्या. तुमच्या नवऱ्याचं आयुष्य नावारूपाला आणलं. मोठ्या हौसेनं सून घरात आणली. आणि ती ही सून!'

'तू आईची बाजू घेतोस तशी मलाही आईची बाजू घेता येणार नाही का? पण इथं आईचा काय संबंध?' थोरला भाऊ टोचून म्हणाला.

'मी कुणाची बाजू घेत नाही. मला कुणीच प्रिय नाही. सत्य प्रिय आहे.'

'मोठे धर्माचे अवतारच लागून गेलात ना?' वहिनी.

'आणि तुम्ही कोण सावित्रीचे वाटतं?'

'अरे, पण तू आता गप्प बसायचं काय घेशील?'

'मी कसलाही अन्याय सहन करणार नाही!'

'कसला अन्याय? चांगलं खायला प्यायला मिळतंय ना दोन वेळा!' वहिनी.

'काही तुमच्या जिवावर खात नाही! माझा हक्क आहे या घरात!'

'घड वर्षाच्या वर्षाला पास होता येत नाही. आणि ब्रह्मज्ञान मुखावर केवढं घोळतंय?'

'असं ब्रह्मज्ञान घोळायला देखील सात जन्माची पुण्याई लागते.'

'ब्रह्मज्ञान! आईसमान वहिनीशी उर्मटपणानं वागणं!'

'आई म्हणवून घ्यायला सुद्धा पात्रता लागते!'

'लहानपणी ढुंगणं धुतलीय तुमची ते नखातला गू गेला नाही माझ्या अजून?'

'तुमच्या थोरल्या भावजयीचा तरी कुठं गेलाय?'

भांडणं थांबत नाहीत असं पाहून आई उठून बसली. तिला त्याला सुद्धा फार कष्ट पडले तिचे डोळे लकलकू लागले. मान हलू लागली आणि कंबर डुगडुगू लागली. तिच्याकडे पाहून मला तिची फार कीव आली. बापू दाराच्या उंबऱ्यात बसून होते ते तसेच बसून होते. एक शब्द बोलत नव्हते. बाहेरच्या माणसाला वाटावं की हे जणू मुकेच आहेत. तशी आई फार म्हातारी नाही. पण आजारानं पोखरली आहे. एक एक शब्द जिभेवर जमवीत ती म्हणाली,

'हे बघ भाऊ आणि सूनबाई!...' मग ती बराच वेळ पुन्हा थांबली. पुन्हा लुकलुकत्या डोळ्यानी थोरल्याकडे पाहात म्हणाली,

'अरे, आता दिवाळीला किती दिवस आहेत?'

'तीन आठवडे.' भाऊ.

'मग असं करा. ही दिवाळी तरी नीट आनंदात गोळ्या मेळ्याने घालवा. पुढच्या दिवाळीला काही मी नाही. माझ्या माघारी मग काहीही करा!'

आई असं बोलली त्यावर सारेचजण चपापले. फार निग्रहाने आणि दृष्टेपणानं ती बोलली होती. घरातल्या इतरांचं काही सांगता येत नाही. पण मला तरी तिचं मरण कळलेलं होतं!

कळलं होतं म्हणजे त्याची नुसती चाहूल लागली होती. त्याचं रूप कळलं नव्हतं की त्याचे परिणाम कळले नव्हते. फक्त आई लवकरच जाणार याची जाणीव झाली होती. तिच्या बोलण्याचा माझ्याही मनाला चटका बसला. मी उठून बाहेरच्या सोप्यात गेलो आणि समोरच्या विस्तीर्ण पिंपळाच्या झाडाकडे पाहत उभा राहिलो.

सूर्य मावळतीवर टेकला होता. एखाद्या खाली पडलेल्या वस्तूच्या वर चिळकांड्या उडाव्यात तसे त्याचे किरण क्षितिजापासून वर उडाले होते. झाडाच्या पानातून घुसून शेंड्यावर पसरले होते. लाल लाल केशरी पानं वाऱ्याबरोबर सळसळत होती. विषण्ण उदास वाटत होतं. आपलं एवढं मोठं घर, इतके भाऊ-बहिणी, भावजयी, आई-वडील, माणसानी गजबजलेलं. पण मला ओकं ओकं, रितं रितं, वाझ वाटत होतं.

भाडणाचा शीण डोक्यात भरून राहिला होता. डोकं जड जड झालं होतं. मी किती वेळ तिथं उभा होतो कोणास ठाऊक; पण मग हळूहळू काळोखाच्या लाटा येऊ लागल्या. मिनिटा मिनिटानी काळोख गडद होऊ लागला. आणि शेवटी ते पिंपळाचं झाड पूर्णपणे काळोखात बुडून गेलं. पक्ष्यांचा मनात काहूर उठविणारा कलकलाटही थावला.

निमूटपणे मी आतल्या खोलीत आलो. सारे व्यवहार सुरळीत चालले होते. आईने लटपटत जाऊन देवापाशी तेलवात केली होती. वहिनी चुलीपाशी बसून स्वैंपाकाला लागली होती. धाकटी बहीण आज इथंच राहणार होती. ती आईजवळ तिच्या पाठीशी टेकून बसली होती. धाकटा भाऊ दुसऱ्या खोलीत अभ्यासाला लागला होता.

देवापाशी मंद ज्योत तेवत होती आणि बापू त्याच्या बारक्या खोलीत दासबोध वाचीत बसले होते. ते दासबोध मोठ्याने वाचतात. म्हणजे त्यांच्या खोलीत जर कोणी गेलं तर तो त्याना ऐकू येतो!

वाचताना त्यांचा चेहरा गंभीर असतो. मुद्रा शांत असते. शब्दोच्चार ठाम असतात आणि आवाजात एक प्रकारची लीनता आजिजी असते. घरात तेवढीच एक गोष्ट मला सर्वांत जास्त आवडते. म्हणजे मला 'दासबोध' आवडतो असं नाही. बापूच्या तोंडून दासबोध वाचला गेलेला आवडतो. तसं मोठ्या पहाटे आई व्यंकटेशस्तोत्र किंवा हरिपाठाचे अभंग म्हणताना आवडत असे. आता गेल्या कित्येक महिन्यात ती ते म्हणाली नाही. कारण तिला अंथरुणावरून उठवतच नाही.

आठ दहा दिवसापूर्वी मात्र एका सकाळी आईला चागलं बरं वाटत होतं. त्या दिवशी सकाळीच ती उठून बसली. तिचा चेहरा ताजा टवटवीत दिसत होता. तिनं वेणीफणी केली. शिळया कुंकवाच्या जागेवर ताज टवटवीत, लाल भडक कुंकू लावलं. त्याखाली नाकाच्या उगमावर बारीक पिवळया हळदीची टिकली लावली. तोंड स्वच्छ धुतल्यामुळे आणि चेहऱ्यावर सारा उत्साहच भरलेला असल्यामुळे तिचा चेहरा पिवळया धमक केळीसारखा दिसत होता. तिनं सर्वांना चहा करून दिला, स्वत:ही घेतला. तिच्या चेहऱ्याकडे आणि हालचालीकडे पाहून आम्हा सर्वांना वाटलं–आता ही स्वैपाकही करून वाढणार की काय? थोरल्या भावानं तर तिला चिडवीत म्हटलं,

'आता आज पुरणाचा स्वैपाक करणार की काय?'

'असेल तुमच्या नशिबात तर तोही करीन!' आई हसून म्हणाली.

'आता तुला लवकरच बरं वाटेल असं वाटतं आई.'

'नाही रे. आतून सारं भांडं करपलंय!'

'नाही. आता आपण औषध देखील बंद करून टाकू!'

'औषध तर मला केव्हापासूनच नकोय. मेलं मोरीची घन. मोरीत ओतलं काय आणि तोंडात ओतलं काय? सारखंच!'

आणि त्या दिवशी आई दुपारपर्यंत बरी होती. त्या दिवशी तिनं आबाडीची, लसणाच्या फोडणीची भाजी, गरम भाकरी आणि मिरचीचा ठेचा मोठया आवडीनं खाल्ला.

मात्र दुपारी गुंगी येऊन पडली!

आणि त्या निमित्ताने माझ्या एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे बापूंची. आईच्या आजारपणातही बापूंची वृत्ती ढळली नाही. आणि तिला अर्धा दिवस बरं वाटलं. ती स्वत: आनंदात होती. सारं घरआनंदात होतं. पण बापूंच्या वागणुकीत काही फरक पडला नाही. तिच्या आजारपणाच त्याना दु:खही होत नव्हतं की तिच्या बरं वाटण्यानं आनंदही झालेला नव्हता.

हे माझ्या एकदम आणि विशेषत्वाने लक्षात आलं आणि बापूंच्याकडे माझ्या मनाने एकाएकी झेप घेतली. मी तर तेव्हा लहान होतो. सारा चौदा पंधरा वर्षांचा. अगोदरच माझे अनुभव काय असणार? तरीपण त्यावेळी सारं लहानपण मला आठवलं. आणि वेगवेगळया प्रसंगात बापूंची वागणूक माझ्या डोळयापुढे उभी राहू लागली.

एकदा धाकटा भाऊ एकाएकी बेशुद्ध झाला. वेळ सकाळची. त्याची प्रकृती चिंताजनक बनली. सारं घर काळजीत बुडून गेलं. आई तर दहा वेळा मागील परसात तुळशी–महादेवापुढे बसून त्याच्यासमोर डोकं घासून आली. अनेक देवांना अनेक नवस करून बसली. थोरल्या भावाने अनेक डॉक्टराचे उंबरे झिजविले. मी औषधपाण्यासाठी दुकानादुकानातून धावलो. शेजारी-पाजारीही धावपळ करीत होते. पण बापूंचं कशातच काही नव्हतं! ते आपले बैठकीच्या खोलीत स्वस्थपणे बसून होते. क्वचित एखादे वेळी भावाला ठेवलं होतं त्या खोलीशी येत होते व उगीच अर्धा एक मिनिट आत डोकावल्यासारखं करून परत जात होते. कुणाशी एक शब्दही बोलत नव्हते की शब्दानेही त्याच्या प्रकृतीची चौकशी करीत नव्हते!

तेव्हा आम्हीच आमच्या नादात आणि घाईत असल्यामुळे बापूंचं हे वागणं माझ्या लक्षात आलं नव्हतं. पण आता त्या प्रसंगाची आठवण झाली आणि त्याच्या वागण्यावर प्रकाश पडला.

त्यानंतर दिवाळी चांगली पार पडली. आई निजूनच होती. पण जिवाच्या कराराने तिने दिवाळीच्या आनंदात सहभागी होण्याचे ठरविलेले दिसत होते. दिवाळीला बहिणी आल्या होत्या. गर्दी जमली होती. आईची छोटी छोटी नातवंडं होती. फटाके फुलबाज्या उडत होत्या. फराळाच्या गोडतिखट पदार्थांची रेलचेल होती.

दिवाळी झाली आणि ते सारं मावळलं. जल्लोश थंडावला आणि शुकशुकाट झाला. विषण्णता आली. त्यातच आईचा आजार वाढला. जणू ती दिवाळी होईपर्यंत जिवाच्या कराराने टिकली होती. एके दिवशी पहाटे तिची शुद्ध गेली. नाडी मद मंद होत चालली. डोळयातलं तेज मंद होत गेलं. श्वास क्षीण क्षीण होत गेला. आणि थंडावत थंडावत बंद पडला. साऱ्या घराला एकाएकी हादरा बसला. सारेच अवाक झाले. आईच्या आठवणीच्या डोंगराएवढया लाटा अंगावर कोसळू लागल्या.

तरुण आई, मध्यम वयाची आई, उताराला लागलेली आई. आणि वृद्धपणात स्थिरावलेली आई. तिची सर्वच रूपे जिवंत होऊन घरभर फिरू लागली.

दु:खाचे कढ येऊ लागले. बहिणीच्या तर डोळयाचं पाणी खळेनासं झालं. धाकटा भाऊ तर लहानच होता. त्याचं दु:ख जितकं कोवळं होतं तितकंच ते गडद होतं. मी चौदापंधरा वर्षांचा. माझ्या दु:खाची क्षितिजं जरा अधिक विस्तारली होती. थोरला भाऊ गांगरून गेला होता, पण त्याला सर्व काही करावं लागत होतं.

या साऱ्यात मला एकच गोष्ट जाणवली आणि तिचा मला धक्का बसला. ती म्हणजे बापूंची. ते आपली खोली सोडून बाहेरसुद्धा आले नव्हते. एखादं मुकं जनावर अंगणात बांधलेलं असावं तसे ते आपल्या खोलीत बसून राहिले होते. तेवढयातही माझ्या मनात विचार आला की त्यांना यावेळी काय वाटत असेल?

सारं घर माणसांनी गच्च भरलं होतं. एकच एक भावना सर्वांच्या चेहऱ्यावर पसरली होती. प्रत्येकाच्या बोलण्यातही गांभीर्य आलेले होते. प्रत्येक जण अतिशय आजिजीने, कनवाळयाने दुसऱ्याशी बोलत होतं. आईचं कलेवर घरातल्या एका कोपऱ्यात शांतपणे पडलेल होतं. जीवनभरचा इतिहास तिथं गोठून पडला होता.

बापूंची मित्रमंडळी त्यांना भेटायला येत होती आणि जात होती. बापू विचारले जातील तेवढयाच प्रश्नांची उत्तरं देत होते. आपणहून काहीच बोलत नव्हते. काही वेळाने त्यांचे एक विधुर मित्र त्यांच्याकडे समाचाराला आले आणि बापूंशी समाचाराचं बोलण्याऐवजी स्वत:च रडू लागले. त्यांची अंगलट अगदी काटकुळी होती. चेहऱ्यावर असंख्य रेषांचं जाळं पसरलं होत. त्यांच्या नाकाचा शेंडा धारदार होता. हनुवटी निमुळती आणि बायकांसारखी होती. त्याची हाताची मनगटंही अशीच नाजूक होती. त्यांच्या डोळयातून सारख्या पाण्याच्या धारा लागल्या होत्या.

ते बापूना अगदी खेटून बसले होते. त्याच्या खांद्यावर त्यांनी एक हात ठेवला

होता. ते म्हणाले,

'बायको गेली की आयुष्यातला राम गेला रे बापू!'

त्यावर बापूंनी नुसतं त्यांच्याकडे अगदी शून्य नजरेनं पाहिलं आणि पाहतच राहिले.

पुढं ते मित्र म्हणाले,

'मी हे दहा वर्षे भोगीत आहे! काहीच उरलेलं नाही आयुष्यात!'

तरीही बापू गप्पच.

पुन्हा मित्र म्हणाले,

'मरणही येत नाही. ते कुणाच्याच हातात नाही रे बाबा!'

बापू आपले गप्पच.

त्या मित्राना बापूशी काय करायचं होतं हेच समजत नव्हतं. ते बापूचं दुःख हलकं करायला आले होते का या ताज्या दुःखाच्या निमित्तानं स्वतःचं दुःख मोकळं करायला आले होते?

'बापू, तू जाऊन पाहून आलास का तुझ्या बायकोला?'

इथं मात्र त्यानी बापूना प्रश्नच केला होता आणि आता वाटत होतं की, त्या प्रश्नाचं उत्तर देणं बापूना भागच होतं, पण प्रत्यक्षात बापूंनी मित्राकडे निर्विकारपणे पाहून नुसती नकारार्थी मान हलविली. आता मात्र त्या मित्राचा नाइलाज झाला. माझं दोघांकडेही मघापासून बारकाईनं लक्ष होतं. बापूच्या वागण्याचं मला थोडं आश्चर्य वाटलं होतं; नाही असं नाही; पण त्यांच्या मित्राच्या वागण्याचं अधिक आश्चर्य वाटत होतं.

आणि आता बापूनी नकारार्थी मान हलविली तेव्हा मला उलट फार बरं वाटलं. मलाही कुणाच्या फार जवळ जाणं आवडत नाही. अती लगट करणं मनाला पटतच नाही. बापूच्या मित्राच्या भावना खऱ्याही असतील; पण त्या या अशा स्थळी, अशा प्रसंगी व्यक्त करायलाच हव्यात का? माझ्या मनात विचार चालले होते आणि बापूचे मित्र तिकडे धोतराच्या सोग्याने डोळे कोरडे करीत होते. जेव्हा ते पूर्ण कोरडे झाले, तेव्हा त्याच्या भावना बऱ्याच हलक्या झाल्या असं वाटलं.

हळूहळू पावलं टाकीत ते निघून गेले

तेवढ्यात एक वृद्ध बाई मोठ्या दारातून अंगणात आल्या. आल्या आल्याच त्या रडू लागल्या. आत आल्यावर बराच वेळ त्याना काही [सुचरेनाच. मग त्यांना वहिनी दिसली आणि त्या तिच्याकडे ओढल्या गेल्या. वहिनीकडे पाहत त्या म्हणाल्या,

'अशी एकाएकी जाईल असं वाटलं नव्हत!'

वहिनीच्या डोळ्यानाही पाणी आलेलं होतं; पण वहिनीचं दुःख आणि त्या वृद्ध बाईचं दुःख याची पातळी काही केल्या एका रेषेवर येईनात. असं वाटत होतं की, या दोघी स्त्रिया दोन वेगवेगळ्या व्यक्तीसाठी दुःख करीत आहेत! आणि मग माझ्या लक्षात आलं की, इथ प्रत्येकाच्या दुःखाच्या पातळ्या वेगवेगळ्या आहेत.

या सर्व व्यवहारातच तीन तास गेले. मग आईला नेलं. बापूंना स्मशानात आणलं होतं. पण या साऱ्यात गोष्टीत एखाद्या पाहुण्यानं वागावं तसं ते वागत होते. स्मशानातही दूरच्या एका झाडाखाली ते एकटेच बसून राहिले होते. तासा दीड तासात सारं संपलं. कोणी कोणाशी न बोलता एक एक जण परतू लागला. शेवटी आम्ही घरी आलो. घरी आल्यावर काय जेवलो आणि काय नाही हेही आठवत नाही. दुपार टळूनच गेली होती. दुपारनंतरच्या उतरत्या उन्हात विषण्णता कालवली गेली होती. हवेत विलक्षण जडपणा आलेला होता.

समोरच्या सोप्यावर जाऊन बाहेरच्या पिंपळाच्या झाडाकडे पहावं असं वाटत होतं. आई अनंतात विलीन झाली होती. चहूकडे तिचं अस्तित्व असणार! पिंपळाच्या पानांच्या सळसळीत तिचा जिवंतपणा जाणवेल. जरा मनाला ऊब लाभेल. बरं वाटेल, असं वाटत होतं. एकट्याने बाहेर जाऊन उभं राहण्याचं धाडस होत नव्हतं!

इकडंतिकडं करण्यातच तिन्हीसांजा झाल्या. मग मात्र घरात बसवेना. पायात चप्पल सरकावून बाहेर पडलो. थोड्याशा अंतरावर एक छोटंसं तळं आहे. त्याच्या काठावरच्या हिरवळीवर एकटाच जाऊन बसलो. समोरचा जलाशय पाहून अंतःकरणात एकदम भडभडून आलं आणि रडू कोसळलं. मग तिथं मनसोक्त रडून घेतलं. बरंच शांत शांत वाटू लागलं का शांत वाटलं ते मात्र कळलं नाही!

अंगाला गार वारे झोबू लागले तेव्हा उठलो आणि घराकडे चालू लागलो. टॉवरच्या घड्याळात पाहिलं तर दहा वाजून गेले होते. घरी सारी सामसूम होती. रात्री कोणी जेवलंच नसावं. मधल्या खोलीत बारीक दिवा जळत होता. तिथं बहिणी आणि धाकटा भाऊ झोपले होते.

मी माझं अंथरुण घेतलं आणि बापूच्या खोलीत गेलो. तिथंही एक टेबललॅम्प जळत होता. बापू भिंतीच्या कडेला गादीवर झोपले होते. ते माझ्या एकदम लक्षात आलं. कारण बापू नेहमी खोलीच्या मध्यावर अंथरूण टाकून झोपत असत. खोलीच्या एका कोपऱ्यात त्याचा 'दासबोध' आणि इतर वस्तू ठेवलेल्या असत. बापू भिंतीच्या कडेला का झोपले? मनात प्रश्नचिन्ह निर्माण झालं. मी माझी गादी टाकली. अंथरूण झटकलं आणि झोपण्यापूर्वी दिवा काढावा म्हणून टेबलाशी गेलो. तिथून बापूचा चेहरा सहज दिसत होता. माझं एकाएकी त्यांच्या चेहऱ्याकडे लक्ष गेलं. त्याच्या डोळ्यातून घळाघळा पाणी ओघळत होतं. ते नाकाच्या दोन्ही बाजूच्या भिंतीजवळ साचलं होतं. त्याचे गाल ओले झाले होते. जणू सारा चेहराच अश्रूंनी डबडबून गेला होता. मला एकदम भडभडून आलं.

सकाळपासून ज्या बापूकडे मी पाहत आलो होतो ते हे बापू नव्हते. आई आत त्यांच्यामध्ये कुठे तरी खोल दडून बसली होती आणि अश्रूंच्या, एकाएका थेंबाने ते तिला मनाच्या तळापासून वर वर आणायचा प्रयत्न करीत होते.

*मी दिवा काढला आणि त्यांना अनिर्बंध केलं!* □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## ‘ फिनिक्स ’ निवड

# MANWATCHING:

( A Field Guide to Human Behaviour)
**Desmoud Morris**
**Triad Panther**
**Pages 320, Rs. 91.10**

बर्डवॉचिंग, चायना वॉचिंग, ‘ इंदिरा वॉचिंग वगैरे बऱ्याच वॉचिंगविषयी ऐकले होते. जेव्हा डेसमंड मॉरिसचे ‘मॅनवॉचिंग’ हे पुस्तक श्री. गाडगीळ याच्या पॉप्युलर बुक स्टॉल-मध्ये पाहिले तेव्हा थोडा विचारात पडलो. सुरुवातीला वाटले पुस्तक मानसशास्त्रावर असेल; पण थोडे चाळून पाहिले तर प्रत्येक पानागणिक एकापेक्षा एक जास्त चित्रे. कधी रंगीत, तर कधी काळी–पांढरी. पुस्तकाच्या मागच्या मलपृष्ठावर नजर टाकली व लक्षात आले की, हे पुस्तक तर बॉडी लँग्वेजवर आहे. याच विषयावर मी ज्युलियस फास्टचे ‘ बॉडी लँग्वेज ’ नावाचे पुस्तक आमच्या ग्रंथालयात घेतले होते. चाळलेही होत व One of those (American ) things म्हणून ठवून दिले होत.

आपण हातापायानी व शरीराच्या इतर अवयवानी एक प्रकारची भाषा बोलत असतो, ह सुरुवातीला खरेच वाटना; पण डसमड मॉरिससारखा साक्षेपी माणूस जेव्हा या विषयावर ३२० पानाचे पुस्तक लिहितो तव्हा मात्र या विषयाच्या व्यापकतेची कल्पना आली. ‘ द नेकड एप ’ व ‘ ह्युमन झू ’ ही डसमड मॉरिसची पुस्तके जगप्रसिद्ध आहेत. ही दोन पुस्तकेसुद्धा माणूस या प्राण्याचा अभ्यास आहे. माणसात काहीकाही इम्पल्सेस (प्रेरकशक्ती) लक्षावधी वर्षा-पासून आलल्या आहेत तर काही इम्पल्सेस आपल्याला अगदी अलीकडे म्हणजे काही हजार वर्षापूर्वी लाभल्या आहेत, असे एकदा डेसमड मॉरिस म्हणाले होते. या कारणामुळे माणूस या प्राण्याची वागणूक irrational होते. श्री. आर्थर कोसलरचे ( डार्कनेस अॅट नून फेम ) म्हणणे तर असे आहे की, माण-साचा मेंदू जसजसा उत्क्रान्त होत गेला तस-तसा त्यातील एक रेप्टाइलचा भाग तसाच राहिला. तो उत्क्रान्त झालाच नाही. यालाच मेंदूतील ‘ रेप्टिलियन कॉम्प्लॅक्स ’ असे म्हण-तात. या अशा एकतर्फी मेंदूच्या उत्क्रान्तीमुळे माणसाची अवस्था फार बिकट झाली आहे असे कोसलर याचे म्हणणे आहे. हे तीन्ही मेंदु एकमेकाशी फटकून वागतात यामुळेच माणूस या प्राण्याच्या वागण्यात सुसगती नसते. डेसमंड मॉरिस याचे प्रेरक शक्ती-विषयीचे म्हणणे कोसलर याच्या मताशी बरेचसे जुळते. श्री. प्रभाकर पाध्ये याच्या ‘ सौंदर्यानुभव ’ या पुस्तकातही माणसाचे तीन मेंदू या विषयावर बरीच माहिती आहे. Ethology या विषयात कॉनरॅड लॉरेन्स, रॉबर्ट आर्ड्रे व डेसमड मॉरिस ही नावे फार मोठी आहेत. डेसमड मॉरिस यानी आधीच्या पुस्तकाचे ‘ नेकेड एप् ’ हे नाव कशावरून दिले ते या वेळेला त्याचे पुस्तक बघून आठ-वते. जगात माकडाच्या जाती किती आहेत? तर १९३. त्यापैकी १९२ जातीना विपुल केस असतात. १९३ व्या जातीच्या माकडाना केस नसतात ( म्हणजे सर्व अगभर ). तोच माणूस. Naked Ape.

आपल्यापैकी अनेकाना बोलताना, चाल-ताना, नित्याच्या गोष्टी करताना लकबी व हातवारे करण्याची सवय असते. याशिवाय आपण मूक-बधिर नसून कधीकधी साकेतिक भाषा वापरतो. उदाहरणार्थ रस्त्यात कुणी आळखीचा माणूस भटला की, आपल्या भुवया वर होतात किंवा आपल्या हाताचा पजा वळवून आपण समोरच्या माणसाला प्रश्नचिन्हाचा बोध करून देतो. असे किती तरी सकेत, हातवारे व लकबी आपण करतो. हे पुस्तक म्हणज या सकेताचा अभ्यास. सुप्त मनातून केल्या जाणाऱ्या या शारीरिक सके-ताचा अभ्यास आपल्याला वाटतो तितका सोपा नाही व काहीना वाटतो तितका तो क्लिष्टही नाही. डसमड मॉरिसने तर या पुस्तकात चित्राद्वारे व सुटसुटीत भाषेत हा विषय इतका सोपा व मनोरजक करून दिला आहे की, आयुष्यभर आपल्याला या पुस्तकाची आठवण रहावी.

जगात सर्वात धक्कादायक ब्लू प्रिंट असते ती कोणत्याही गुंतागुंतीचा प्रॉजेक्ट किंवा बिल्डिंग याची नाही. एकदा का या ब्ल्यू प्रिंटमध्ये एखादी योजना आखली गेली की जगातले कोणतेच सामर्थ्य त्यात बदल करू शकत नाही. ही ब्ल्यू प्रिंट इतकी मायक्रो ( छोटी ) असते की, आपल्याला तुच्छ वाटावी; पण त्यात इतके मेक्रो आलेख लिहि-लेले असतात की उमर खय्यामच्या ५१ व्या रुबायतची आठवण यावी—

> The moving finger writes;
> and having writ
> Moves on :
> Nor all the piety
> nor wit
> Shall lure it back
> to cancel half a Line,
> Nor all thy tears wash out
> a word of it.”

‘ ही ब्लू प्रिन्ट म्हणजेच जिनेटिक ब्लू प्रिंट. या जनूकाच्या निळ्या आराखड्याद्वारे आपल्याला शरीराची व मनाची जडणघडण वगैरे अनेक बाबी मिळतात. याशिवाय डेसमंड मॉरिस तर असे म्हणतात की, माण-साचे कित्येक शारीरिक संकेत genetically transplant होत आले आहेत. असे म्हटले जाते की, अर्भके अनुकरण करून करून शिकतात. उदाहरणार्थ जन्मापासून मुलगा बधिर असेल तर त्याचे व्होकल कॉर्डस शाबूत असून त्याला बोलता येणार नाही; पण काही काही गोष्टी अशा असतात की, काही जीवात जन्मत:च त्यांना त्या अवगत असतात. उदाहरणार्थ कित्येक जमिनीवरच्या प्राण्याना स्वत:च पोहता येते. ही प्रेरकशक्ती त्याना जनूकाच्या निळ्या आराखड्यातूनच मिळालेली असते. मला वाटते Ethology नी किंवा प्राणिशास्त्रज्ञांनी नकळत सर्वात जोराचा ठोसा मारला असेल तो सार्त्र–कामू हायडेगरना. अस्तित्ववादाला. कीर्कीगार्डच्या उदो उदो करणाऱ्याना. अस्तित्ववाद्याना पटो अगर न पटो, परंतु त्याना हा ठोसा कसा वर्मी लागला हे जनूकाच्या निळ्या आरा-खड्याच्या उदाहरणावरून व environ-ment studies वरून स्पष्ट होईल.

श्री. डेसमंड मॉरिसनी एका जन्मत: अंध अर्भकाचे उदाहरण चित्रासकट दिले आहे. या अर्भकाने कोणत्याही माणसाला कधीही हातवारे किंवा सकेत करताना पाहिले नाही. तरीही चेहऱ्यावरील काही स्नायू, काही

संकेत इतर अर्भकासारखेच काम देऊ लागले. याला डेसमंड मॉरिस हे इनबॉर्न ॲक्शन्स म्हणतात. हे आपल्याला शिकावे लागत नाही. त्याशिवाय इतर ॲक्शन्स, जेस्चर्स, सिग्नल्स, गेझ बिहेवियर, बॉडी कॉन्टॅक्ट, ऑटो–कॉन्टॅक्ट, पेरेंटल सिग्नल्स, मेटासिग्नल्स कट ऑफ वगैरेचे विवेचन इतके केले आहे की, कधी आपल्याला हसू येते, तर कधी विश्वास बसत नाही, तर कधी लेखकाच्या साक्षेपी लिखाणाबद्दल व चित्राबद्दल कौतुक वाटते, तर कधी मनोरंजन होते, तर कधी उत्कृष्ट व उपयोगी माहिती मिळते. कधी कधी देशविदेशातील मनुष्यस्वभावांचे चित्र-विचित्र पैलू आढळतात.

तळपायाची आग मस्तकाला गेली की माणूस लालबुंद होतो. डेसमंड मॉरिसच्या मते असा माणूस भयावह नसतो. याउलट ज्या माणसाचा चेहरा रागाने पांढराफट-फटीत पडतो त्याच्यापासून मात्र सावध रहा! ॲक्शनसाठी या माणसाचे सर्व रक्त मेंदूकडे व स्नायूकडे धाव घेते. असला पांढराफट-फटीत माणूस कधी हल्ला करील त्याचा नेम नाही. या दोन्ही चेहऱ्याची रंगीत चित्रे पान नं. १३८ वर दिली आहेत. ती फार मजेदार आहेत. आता लालबुंद रागीट माणूस पाहिला की त्याला आणखीन थोडे डिवचा. तो लालबुंद असतानाच जर अंगावर धावून आला तर श्री. डेसमंड मॉरिसना दोन शिव्या हासडा!

'बॉडी लॅंग्वेज' हे एक शास्त्र मानले जावे या उद्देशाने या विषयावर डॉ. रे बर्ड व्हिस्टेल यानी 'An Introduction to Kinesics' हे पुस्तक लिहिले आहे. Kinesics म्हणजेच बॉडी लॅंग्वेज.

याशिवाय आमच्या वाचनालयात फेस लॅंग्वेजवरही पुस्तके आहेत.

आमच्या वाचनालयात एक 'नॉलेजेबल' वाचक येतो. तो एकदा म्हणाला होता की, तर्जनी नाकपुडीत किंवा तिच्या बाजूला ठेवणे याचा अर्थ म्हणजे संभोगाला निमंत्रण. आमच्याकडे आचार्य रजनीशाचे एक शिष्य स्वामी दिवाकर भारती हेही येतात. २४ वर्षांचे. त्यानी याबाबतीत दुजोरा दिला, तेव्हा पटले. पण इंग्लंडमध्ये या खुणेचा अर्थ गुपित ठेवणे असा होतो आणि इटलीमध्ये त्याच खुणेचा अर्थ 'Take care, there is danger.' असा होतो; वेगवेगळ्या देशात बॉडी लॅंग्वेजचे निरनिराळे अर्थ आहेत, हे यावरून सिद्ध होते. कुणी इटालियन स्त्रीने भारतीय पुरुषाला तर्जनीची खूण केली की भलताच गैरसमज होण्याची शक्यता आहे.

बॉडी लॅंग्वेज हे आता इतके पुढे गेलेले आहे की, त्याला एक मराठी नाव मिळेल. TM ला जसं शेवटी भावातीत ध्यान मिळाले तसे शारीरिक वाणी, शरीरभाषा, तन–वाचा, तन–बोली असे काही तरी नाव मिळेल; पण डेसमंड मॉरिसची ती माय-बोलीच!

–जे. एन्. पोंडा


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | रु. |
|---|---|
| १. मिटल्यानंतर : शिवराम कारंथ. अनुवाद : केशव महागावकर | ७–२५ |
| २. मोसम : (कथासंग्रह) विजया काळे | १२/– |
| ३. आठवणी : प्रमोद नवलकर | १८/– |
| ४. वेड : (कथासंग्रह) सौ. वसुधा पाटील | २०/– |
| ५. प्रिय बाई : अनुवादक सुधा कुलकर्णी | ६/– |

**ENGLISH**

1. The Birth of Reason & Other Essays : George Santayana.
2. The Restoration of the Earth : Theodore B. Jaylor & Charles C. Humpatone.
3. The Future of The Oceans : Ecology : Wolfgang Friedman

* 'Time' & 'Newsweek' are Rs. 1095/– for three years! Our priority subscription for three years is Rs. 440/. Your copy of Time & Newsweek will be reserved. Plus that you save hundreds of rupees and can read books worth thousands of rupees. Offer limited!

**दि फिनिक्स लायब्ररी ७२७ सदाशिव, पुणे ३०**


# व्हान गॉग

## चित्रकलादर्शन

बुधवारी संध्याकाळी (दि. १३ फेब्रुवारी) पुण्याच्या नारायण पेठेतील स्नेहसदनमध्ये फ्रान्स मित्र-मंडळाने एक कार्यक्रम आयोजित केला होता. प्रसिद्ध डच-फ्रेंच चित्रकार व्हिन्सेंट व्हान गॉग या चित्रकाराचा माधुरी पुरंदरे यानी या कार्यक्रमात परिचय करून दिला.

आधी साध्या सरळ निवेदनातून त्यांनी या झपाटलेल्या कलावंताच्या अल्पकालीन आयुष्याचा आलेख श्रोत्याना सादर केला आणि नंतर चित्राच्या सुंदर स्लाइड्सद्वारा त्याच्या कलेचे दर्शनही त्यांनी रसिकाना घडविले. व्हान गॉगचे आयुष्यच इतके झपाटलेले, इतके जबरदस्त, की माधुरीच्या साध्या निवेदनातही श्रोते पूर्ण रंगून गेले होते.

व्हान गॉगचा जन्म १८५३ चा. हॉलंड-मधील एका सधन डच धर्मगुरूच्या कुटुंबात हा कलावंत जन्माला आला. याचे दोन काका कलाकृतीच्या व्यापारात होते. लंडन-मध्ये काकाच्या आर्ट गॅलरीत व्हिन्सेंटने सुरुवातीस काही काळ चित्रविक्रेत्याची नोकरी केली. तिथेच त्याचा चित्रकलेशी संबंध आला. तिथे सहज म्हणून तो चित्र-रेखाटन करू लागला.

या काळात लंडनमध्ये एका कुटुंबात पेइंग गेस्ट म्हणून व्हिन्सेंट राहत असताना त्या कुटुंबातीलच उर्सुला नावाच्या मुलीच्या तो प्रेमात पडला. या मुलीचे त्या आधीच दुसऱ्या तरुणाशी प्रेम जुळले होते. तिने काहीशा उर्मटपणेच व्हानचे प्रेमाचे आवाहन धुडकावले आणि मनस्वीवृत्तीच्या व्हानला त्याचा फार धक्का बसला. मनाच्या सैरभैर अवस्थेत तो घरी परतला. अजूनही प्रयत्न करून उर्सुलाचे मन आपल्याकडे वळविता येईल अशी आशा बाळगून तो पुन्हा नोक-रीच्या निमित्ताने लंडनच्या जवळील रॅम्स-फिल्ड या गावी राहण्यास आला. रॅम्सफिल्ड ते लंडन हे अंतर होते १२० किलोमीटर्सचे; पण व्हिन्सेंट दर आठवड्यातील शुक्रवारी

संध्याकाळी उर्सुलाच्या भेटीच्या, किमान दर्शनाच्या आशेने चालत लंडनला जात असे व पुन्हा चालत परत येत असे. काही दिवसातच उर्सुलाचे लग्न झाले आणि व्हानची उरलीसुरली आशाही संपली. व्हानला वाटले *आता आपल्या आयुष्यात स्वतःसाठी* जगण्यासारखे काही राहिलेले नाही. आता परमेश्वराची सेवा करणे हेच आपले काम. रॅम्सफिल्डची शाळेतील नोकरी सोडून व्हान एका चर्चमध्ये क्लर्जीच्या हाताखाली नोकरी करू लागला. चर्चच्या कॉन्व्हेंटमधील मुलांना धार्मिक प्रवचने देण्याबरोबरच या मुलाची फी त्यांच्या घरोघर हिंडून गोळा करण्याचे काम त्याला तिथे करावे लागले आणि हे काम करताना त्याला घडलेल्या दारिद्र्याच्या दर्शनाने तो हबकून गेला, नोकरी सोडून पुन्हा हॉलंडमध्ये घरी परतला. वडिलांच्या आग्रहावरून त्याने आता रीतसर धर्मशिक्षकाचा शिक्षणक्रम पूर्ण करण्याचे ठरविले. त्यासाठी वर्षभर अठरा-अठरा तास अभ्यास करून त्याने कसून तयारी केली; पण परीक्षा येऊन ठेपली तसे त्याच्या लक्षात आले की, या पुस्तकी अभ्यासाचा लोकाची दैन्यावस्था बदलण्यासाठी काहीही उपयोग होणार नाही. प्रत्यक्ष काम करण्याचे त्याच्या मनाने घेतले. त्यादृष्टीने इव्हॅंजेलिस्ट होण्याचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे त्याने ठरविले. परंतु तो करतानाही त्याच्या लक्षात आले की, ही नुसती पोपटपंची आहे. तो पुन्हा अस्वस्थ झाला. त्याची ही अस्वस्थता पीटर्सन नावाच्या एका शिक्षकाच्या लक्षात आली. त्यांनी व्हानला बेल्जिअममधील बोरीनाज येथील कोळशाच्या खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगारामध्ये जाऊन काम करण्यास सुचविले. चर्चच्या वतीने त्या ठिकाणी इव्हॅंजेलिस्ट म्हणून त्याची नेमणूक होण्यासाठीही पीटर्सननी खटपट केली आणि व्हान मोठ्या आनंदानं बोरीनाजमध्ये येऊन दाखल झाला. तेथील कामगारांच्या भीषण दैन्यावस्थेचे आव्हान त्याने स्वीकारले आणि तो कामाला लागला. त्या कामगाराच्यातलाच एक होऊन राहिला. कामगार आपल्यापासून मनाने दूर राहू नयेत म्हणून दरिद्री झोपडी, कडब्यावर निजणे, फाटकेतुटके कपडे आणि कोळशाने माखलेला काळा चेहरा या सर्वांचा त्याने बुद्धयाच स्वीकार केला होता; पण याचा परिणाम भलताच झाला. त्याचे काम पाहण्यास आलेल्या चर्चच्या अधिकाऱ्यांनी हे सर्व पाहिले आणि त्यांना धक्काच बसला. लोकांत जाऊन काम करताना या गृहस्थाने चर्चच्या प्रतिष्ठेचा कसलाच मुलाहिजा ठेवला नव्हता. त्यांनी व्हानची नेमणूक रद्द केली, अर्थातच त्याचा पगारही बंद झाला. या अनुभवाने व्हिन्सेंट निराश झाला याच वेळी खाणीत झालेल्या एका अपघातातील ५७ कामगारांची प्रेते बाहेर काढावीत व खाणीतील सुरक्षा व्यवस्थेत थोडी तरी सुधारणा करावी या मागण्यांसाठी संपावर गेलेल्या कामगारांसाठी तो कंपनीकडून कसलेही आश्वासन मिळवू शकला नव्हता. कामगारांनी निष्ठेने व्हानवर आपले नेतृत्व सोपविले होते; पण व्हान अपयशी ठरला. या दोन अनुभवांनी व्हिन्सेटची धर्मावरील आणि परमेश्वरावरील श्रद्धा साफ उडाली. बोरीनाजमधील कष्ट आणि उपासमारीने त्याची तब्येतही पार ढासळली होती. पुढे काय करायचे हे त्याला समजत नव्हते. या अवस्थेतच एक दिवस त्याने सहज खिशातील पत्राच्या कोऱ्या बाजूवर खाणीतून बाहेर पडणाऱ्या कामगाराचे चित्र रेखाटले आणि मग झपाटल्यासारखी काही दिवस त्याने अशी अनेक रेखाटने केली. त्याच्या चित्रात तंत्र नव्हतं, आकृतींचं प्रमाणही साफ चुकलं होतं पण तरीही चित्रामधील ती माणसं खास बोरीनाजचीच दिसत होती. त्याची दुःखं, दैन्यावस्था व्यक्त होत होती. व्हानला सूर सापडला. त्याने चित्रकार व्हायचं ठरवलं. आधीची सगळी अपयशं त्याच्या मनातून पार निघून गेली. कलानिर्मितीइतका निखळ आनंद परमेश्वराच्या सेवेतही त्याला मिळाला नव्हता.

वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी त्याच्या आयुष्यानं नवं वळण घेतलं. आपल्याला चित्रांमधून काही तरी सांगायचं आहे, व्यक्त करायचं आहे, हाच ध्यास त्याने घेतला. तेओ या धाकट्या भावानं त्याची आर्थिक जबाबदारी घेतली. चित्रकलेचं पद्धतशीर मार्गदर्शन मिळविण्यासाठी व्हिन्सेंन्ट द हेगला अ‍ॅन्टन मोव्ह या प्रख्यात चित्रकाराकडे दाखल झाला आणि पुढच्या दहा वर्षांत अनेक चित्रकार, अनेक शहरं आणि खेडी व्हानच्या आयुष्यात येऊन गेली आणि कुठेही स्थिर न होता व्हिन्सेंट सर्वस्व ओतून चित्रं काढीत राहिला.

व्हिन्सेंटच्या आयुष्यात उर्सुला, मावस बहीण के, द हेगमधील वेश्या खिस्तीन आणि न्यूनॉन येथील त्याच्या घराजवळील, त्याच्यापेक्षा दहा वर्षांनी मोठी असलेली मार्गोट अशा चार स्त्रिया आल्या. आपलं लहानसं घर असावं, आपल्यावर प्रेम करणारं कुणीतरी जवळ असावं, मुलं असावीत असं व्हिन्सेंटला मनापासून वाटत असे, पण त्याचं हे स्वप्न कधीच पूर्ण झालं नाही.

न्यूनॉन येथील वास्तव्यातच व्हिन्सेंटनं *'बटाटे खाणारे'* हे नतर जगप्रसिद्ध झालेलं चित्र रंगवलं. बटाट्याच्या मातकट रंगात रंगविलेल्या या चित्रात ब्राबन्टमधील दरिद्री शेतकरी अमर करून ठेवला आहे. यानंतर व्हिन्सेट पॅरिसमध्ये आला. तिथे तेओच्या आग्रहावरून इंप्रेशनिस्ट चित्रकारांच्या सान्निध्यात तो आला. त्याला स्वतःचीच अशी चित्रं काढायची होती. कुणाचाही प्रभाव त्याला आपल्या चित्रावर नको होता. शहरामध्ये राहणंही त्याला कधी आवडत नसे. तिथे त्याला गुदमरल्यासारखं होई. पॅरिसमधील वास्तव्यात मोने, दगा, पिसारो, माने, लोत्रेक, सरा, सेझान, गोगॅं, इत्यादी चित्रकाराच्या कलेशी आणि यातील अनेक चित्रकारांशी व्हिन्सेंटचा परिचय झाला. त्याच्या इंप्रेशनिस्ट पद्धतीचा त्याच्यावर प्रभाव पडला. एखादा क्षण जसा कालाकाराला दिसला असेल अनुभवाला आला असेल तसा तो रंगवण, तपशिलापेक्षा तो क्षण चित्रात पकडणं हे या पद्धतीचं वैशिष्ट्य. प्रकाशाचा अंतर्भाव हे या चित्राचं आणखी एक वैशिष्ट्य. व्हिन्सेंटला ते आवडले. परंतु पॅरिसमध्ये फार काळ राहणं त्याला शक्य नव्हतं. प्रखर सूर्याची वेगवेगळी रूपं रंगविण्याची ओढ त्याला लागली होती. त्यासाठी तो सर्व सोडून आर्ल या गावी येऊन राहिला. मुख्यतः पिवळ्या आणि निळ्या रंगाचा वापर करून त्यानं असंख्य चित्रं काढली. *माणसं, निसर्ग, प्राणी,* सूर्य, प्रकाश हे त्याच्या चित्राचे विषय होते. प्रचंड वेगाने तो चित्र काढीत असे. आयुष्याच्या शेवटी ओव्हेर येथील वास्तव्यात दोन महिन्यात त्यानं ६१ चित्रं काढली. मानसिक व शारीरिक आजारपणामुळे त्याचा चित्राचा वेग कमी झाला. आता *जगण्यासारखं* काही राहिलेलं नाही, आपल्याजवळ जेवढं सांगण्यासारखं होतं ते सांगून झालं आहे, आता पूर्ण वेड लागण्याच्या

आतच आपण जगाचा निरोप घेतला पाहिजे या विचारातून त्याने वयाच्या ३७ व्या वर्षी आत्महत्या केली. त्याच्या आयुष्यात त्याचं फक्त एक चित्र विकलं गेलं आणि फक्त एका समीक्षकाचा त्याच्या कलेवरील लेख प्रसिद्ध झाला.

व्हिन्सेंट व्हान गॉगच्या काळातील युरोपातील सगळेच मोठे कलाकार असे झपाटलेले होते. कुठल्याही लाभाच्या अपेक्षेने त्यांनी चित्रं काढली नाहीत. 'मी चित्रं काढली नाहीत तर मी जगू शकणार नाही,' अशीच त्यातील प्रत्येकाची तळमळ होती. कारागिरीच्या, अमीरउमरावाच्या, शहरी विलासी जीवनाच्या प्रभावातून बाहेर येऊन लोकांमध्ये जाऊन त्यांनी आपली चित्रं काढली. प्रेक्षकांशी संवाद साधणारी ती जिवंत चित्रं होती.

निवेदनानंतर माधुरीने आधी व्हिन्सेंटच्या आधीच्या आणि समकालीन चित्रकारांच्या काही स्लाइडस् दाखविल्या आणि नंतर व्हिन्सेंटच्या काही चित्राच्या स्लाइडस् दाखविल्या. अनेक रंगांमध्ये, जोरकसपणे रंगविलेली ही चित्रं स्लाइडस्मुळे, त्यातील उजेडामुळे अधिकच जिवंत वाटत होती. माधुरीनं सादर केलेल्या या कार्यक्रमात शेवटपर्यंत कुठेही कंटाळा आला नाही. माधुरी स्वत: कलाकार आहे. त्यामुळे ज्या आत्मीयतेने तिने हे सर्व सांगितले त्याचाही हा परिणाम असावा. अलिकडेच व्हिन्सेंट व्हान गॉगच्या जीवनावरील आर्यव्हिंग स्टोनच्या 'लस्ट फॉर लाइफ' या कादंबरीचा मराठी अनुवाद माधुरीनं केला आहे. या पुस्तकाच्या प्रास्ताविकात कलाकार व्हिन्सेंटविषयी माधुरीने मोजक्या शब्दांत फार चागलं लिहिलं आहे ती म्हणते, '.. एका विलक्षण ओढीनं त्यानं पेन्सिल हातात घेतली. मग फक्त मृत्यूच त्याला थाबवू शकला! दारिद्र्य, उपासमार वगैरे अडचणी फुटकळ होत्या. केवळ दहा वर्षात त्यानं केलेलं प्रचंड काम पाहून अक्षरश: सटपटून जायला होतं. त्या प्रत्येक चित्रात त्याचं स्वत.ला झोकून देणं जाणवतं...त्याचं उर्सुलाला केवळ पाहण्याकरता रात्र रात्र चालणं, खाण–कामगारांकरिता जीव तोडून झिजणं,...आणि बारा बारा तास पेटत्या उन्हात काम करणं हे सारंच उत्कट होतं. म्हणूनच त्याची चित्रं फार खरी वाटतात.'

व्हिन्सेंटचं हे जगणं म्हणजे कलेच्या क्षेत्रातील एका क्रांतिकारकाचं जगणं होतं. सगळ्याच क्षेत्रातील धडपडणाऱ्या माणसाना ते स्फूर्तिदायक वाटे. —अनिल काळे

## गोडसे व्हायोलिन विद्यालय, पुणे

# दर्जेदार संगीताच्या तीन रात्री

पुण्याचे मधुकरराव गोडसे म्हणजे उत्साही माणूस! - आणि त्यांच्या तालमीत तयार झालेला त्याचा पुतण्या नंदू तर त्याहून उत्साही. संगीताच्या प्रांतात काही तरी भव्यदिव्य करावं या मधुकररावांच्या स्वप्नात नंदूपण रंगलेला. गोडसे व्हायोलिन विद्यालय जेव्हा या भव्य स्वप्नांच्या दिशेनं पहिली अडखळणारी पावले टाकीत होते तेव्हापासूनची वाटचाल मी अगदी जवळून पहातो आहे अविरत परिश्रम, नेमका लोकसंग्रह आणि शिक्षणातला प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर गोडसे व्हायोलिन विद्यालयानं खूप प्रगती केली आहे. परवाच्या नऊ, दहा आणि अकरा तारखेला यशस्वी रीतीने साजरे झालेले संगीतसंमेलन म्हणजे या विद्यालयाच्या आणि मधुकररावांच्याही यशाचा आणखीन एक मानाचा तुरा म्हणायला हरकत नाही.

इंडियन टोबॅको कंपनी, कलकत्त्याची संगीत रिसर्च अॅकेडमी आणि गोडसे व्हायोलिन विद्यालय यानी मिळून हे भव्य संगीतसंमेलन आयोजित केलं होतं. आठ तारखेलाच पं. रविशंकर आणि उस्ताद अल्लरक्खा या आंतरराष्ट्रीय आणि लोकप्रिय जोडगोळीचा कार्यक्रम प्रचंड गर्दीत पार पडला होता. तेव्हा त्यानंतर लगेचच होणाऱ्या या तीन रात्रीच्या संगीतमहोत्सवाला लोकांचा कसा काय प्रतिसाद मिळेल अशी एक शंका मनाला चाटून गेली होती; पण शनिवारी रात्री रमणबागेचं आवार संगीतशौकिनांच्या गर्दीने भरलेलं पाहून बरं वाटलं.

रात्री दहा वाजता मधुकररावांनी प्रास्ताविक भाषण केलं. त्यानंतर संगीत रिसर्च अॅकेडमीचे डायरेक्टर श्री. विजय किचलू यांनी अॅकेडमीच्या कार्याची माहिती दिली. या अॅकेडमीनं अनेक महनीय संगीतकारांना गुरु म्हणून नेमलेलं आहे. त्याना भरपूर मानधन आणि इतर सुखसोयी मिळवून दिल्या आहेत. शिष्यानाही मासिक हजार रुपयांची शिष्यवृत्ती आहे. याशिवाय निरनिराळ्या शहरात आणि गावात संगीतसंमेलने भरवून संगीताचा प्रसार करण्याचेही कार्य ही संस्था करते. ही सर्व माहिती ऐकून बरं वाटलं. धूम्रपान आरोग्याला अपायकारक आहे असं बजावून सांगणारी ही तंबाखूची कंपनी संगीतकार आणि संगीतप्रेमी रसिकावर उपकारच करते आहे हे जाणवलं.

### मर्दानी गाणे

शनिवारच्या मैफिलीची सुरुवात सौ. ललित राव याच्या गाण्याने झाली. आग्रा घराण्याची गायकी स्त्रियाना कितपत शोभून दिसेल अशी शंका अनेकाच्या मनात होती; पण सौ. ललित राव यांनी आपल्या गायनानं ही शंका दूर केली. त्याचा आवाज कर्णमधुर आहे. त्याच्यावरचा त्यांचा काबू पण सुरेख आहे. आवाजाला लहानमोठा करण्याची त्यांची किमया पण चांगली आहे. त्यानी त्या रात्री भूप रागाचे दोन ख्याल, नंतर एक ठुमरीवजा बंदिश आणि बसंत रागातला तराणा सादर केला. भूप रागात वारंवार निषादाचा स्पर्श झाल्यामुळे शुद्धकल्याणाचा भास होत होता. हा एक मुद्दा सोडला तर त्याचे गायन सुरेख झाले. त्यांच्याबरोबर पेटीला आप्पा जळगावकर आणि तबल्याला आनंदगोपाल (कलकत्ता) होते.

पं. हरिप्रसाद चोरसिया यांचं मधुर मुरली वादन आणि त्याच्याबरोबर तबल्याच्या साथीला जाकीर हुसेन असा मणिकाचन योग फार दिवसानी आला होता. रसिक मोठ्या आतुरतेने या कार्यक्रमाची वाट पहात होते. पं. हरिप्रसाद आणि जाकीर हुसेन यानी

लोकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. हरीजींनी जोग रागात आधी आलाप, जोड आणि झाला वाजवून त्यानंतर झपतालात एक सुदर गत वाजवली. त्यानतर हंसध्वनी रागातल्या दोन रचना तीन तालात वाजवून टाळ्यांच्या गजरात त्यांनी आपला मधुर कार्यक्रम संपवला. अत्यंत मुलायम फूक, विलक्षण कल्पकता आणि ताल स्वरावरची जबरदस्त पकड यामुळे हरीजीचा कार्यक्रम नेहमीच यशस्वी होतो. त्यातून जाकीर हुसेन याच्या लाजवाब तबला साथीमुळे हा कार्यक्रम खूपच रंगला. अनेक वेळा श्रोत्यांच्या टाळ्यांची उत्स्फूर्त दाद मिळाली.

हरीजीचा कार्यक्रम संपला तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते. उस्ताद लताफत हुसेनखा यांनी पहाटेचाच राग रामकली आळवायला सुरुवात केली. रुंद आवाज आणि ठोस गायकी यामुळे त्याची रामकली हवा तो परिणाम साधून गेली. त्यांच्या साथीला आनंदगोपाल, आप्पा जळगावकर आणि पं. व्ही. जी. जोग होते. भैरवी गाऊन उस्तादांनी पहिल्या मैफिलीची सांगता केली.

## सुरेल सतार

रविवारच्या कार्यक्रमांची सुरुवात शाहेद परवेज याच्या सतारीने झाली. या तरूण सतार वादकाने राजेश्री रागात आलाप, जोड आणि झाला वाजवून श्रोत्यांची दाद घेतली. सुरेलपणा बरोबरच अत्यंत कल्पक आणि गमकयुक्त स्वरातली आणि तानांची विलक्षण तयारी यामुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले. द्रुत एकतालातली सहसा सतारीवर ऐकायला न मिळणारी गतही त्यांनी तयारीने वाजवली. जवळ जवळ दोन तास चाललेला हा रागेश्री किंचित पसरट वाटला; पण या रागेश्रीत या कलाकाराच्या वादनाची सर्व अंगे पूर्णपणे प्रकाशित झाली. आनंदगोपाल याची तबल्याची साथही अप्रतिम झाली.

पं निवृत्तिबुवा सरनाईक यानी दोन अप्रचलित रागातल्या सुरेख बंदिशी सादर केल्या. पहिला राग होता 'पूर्वा' आणि आणि त्यानंतर रामदासी मल्हार. पूर्वा रागात पूर्वी आणि रामकली याची छाया होती. रामदासी मल्हारातले दोन्ही गांधार बुवांनी फार कल्पकतेने वापरले. बोलताना म्हणजे तर बुवांच्या गायनाचे खास वैशिष्ट्य. या बोलतानाचे अनेक प्रकार दाखवून बुवानी आपले गाणे इतके रंगविले की, समोर ऐकायला बसलेले भीमसेन जोशी सारखी वाहवा देत होते. त्यांच्या बरोबर तबल्याला आनंदगोपाल आणि पेटीला आप्पा होते.

रात्री दोनच्या सुमाराला पं. व्ही. जी. जोग रंगमचावर आले त्याच्या साथीला जाकीर हुसेन होते. जोगानी व्हॉयलीनवर राग किरवानी वाजवला. जाकिर हुसेन याना भरपूर वाव मिळावा म्हणून त्यानी मुद्दाम सतारीची मसीदखानी गत वाजविली. जाकिर हुसेन याच्या तबला वादनामुळे या कार्यक्रमात सारख्या टाळ्या मिळत होत्या. किरवाणीनंतर धुन वाजवून त्यांनी दुसऱ्या रात्रीच्या कार्यक्रमाची सागता केली.

## सदा सतेज गाणे

सोमवारी रात्री मैफिलीची सुरुवात केली श्री. अजय चक्रवर्ती या उगवत्या कलाकाराने. या गायकाचा आवाज निर्मल आणि मधुर आहे. मुनव्वरअलीखांसारख्या चागल्या गायकाची तालीमही मिळाली आहे. त्यामुळे त्याचे गाणे कर्णमधुर वाटते. त्याने आळवलेला यमन, त्यानंतरचा गावती आणि त्यानतरची पिलूची ठुमरी लोकाना खूपच आवडली. अजयचे गाणे आणखी आटोपशीर झाले तर जास्ती परिणामकारक होईल.

अजयच्या गाण्यानंतर, गोडसे व्हायोलीन विद्यालयाची स्मरणिका 'स्वरश्री'चे प्रकाशन श्री. विजय किचलू याच्या हस्ते झाले. त्यानंतर रगमंचावर माणिक वर्मा आल्या. श्रोत्यानी टाळ्या वाजवून त्यांचं स्वागत केलं. माणिकताईंचा आवाज सुरेख लागला होता. त्यानी नायकी कानडा, त्यानतर खमाजची ठुमरी आणि 'नरवर कृष्णासमान' हे पद सादर केलं. गोड आवाजातल्या त्या नीटनेटक्या गायनाचा श्रोत्यावर इतका प्रभाव पडला की, श्रोते त्यांना उठूच देईनात. लोकाग्रहास्तव, 'सावळाच रंग तुझा' हे भावगीत अतिशय तन्मयतेने रंगवून टाळ्यांच्या गजरात त्यानी आपले गाणे संपविले इतकी वर्षं झाली पण माणिकताईंचं गाणं पंचवीस वर्षापूर्वीच्या त्याच्या गाण्याप्रमाणेच सतेज आहे.

## रंगलेले संतूरवादन

पं. शिवकुमार शर्मा याच्या संतूरवादनाच्या साथीला जाकिर हुसेन बसणार म्हणून श्रोते संतूरवादनाची आतुरतेने वाट पहात होते. दोन्ही कलाकार रंगमंचावर आले तेव्हा श्रोत्यानी त्याचं टाळ्यांनी स्वागत केलं. शिवकुमारजीनी जवळजवळ पावणे दोन तास चंद्रकंस वाजवला. जाकिर हुसेन याच्या तयार आणि रंगतदार साथीमुळे हा कार्यक्रम अविस्मरणीय झाला. झपताल आणि द्रुत तीन तालातल्या गतीमध्ये विविध प्रकारचे बोल वाजवून जाकिर हुसेन यानी प्रत्येक समेला टाळी घेतली. अतिद्रुत लयीत तर सतूरचा झाला आणि तबल्याचा ठेका इतका एकजीव झाला होता की, क्षणभर तबला कोणता आणि संतूरचा नाद कोणता याचा सभ्रम पडावा. चंद्रकंस संपवून शिवकुमार उठले. पण श्रोते त्यांना जाऊ देईनात. लोकाग्रहास्तव शेवटी एक धुन वाजवून पहाटे साडेचारला त्यानी या संगीत संमेलनाची सागता केली. तीन दिवस इतके दर्जेदार कार्यक्रम ऐकविल्याबद्दल गोडसे व्हॉयोलीन विद्यालयाला धन्यवाद देत श्रोते पहाटेच्या गारव्यात घरी परतले.

—अरविंद गजेंद्रगडकर


# व्हॉन गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या
आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा
मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे
पर्वती, पुणे

# संगीत रंगभूमीची वाटचाल

## विचारांना चालना देणारी व्याख्याने

संगीत रंगभूमी शताब्दिनिमित्त लोकमान्य सेवा संघ विलेपार्ले, येथे दि. ११ ते १३ फेब्रुवारी अशी एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती.

दि. १२ फेब्रुवारी या दिवशी श्री. अशोकजी परांजपे यांचे भाषण झाले. विषय होता 'लोकनाट्याची संगीतपरंपरा' श्री. अशोकजी परांजपे हे लोकसंगीत आणि लोकनाट्याचे अतिशय चाहते आणि अभ्यासक आहेत. त्यांनी भारतभर प्रवास करून निरनिराळ्या प्रांतांतले लोकसंगीत ऐकले आहे, अभ्यासले आहे. त्याचा उपयोग त्यांनी आपल्या नाटकात केला आहे. चीन, बँकॉक, थायलंड, फिलिपाइन्स येथेही ते जाऊन आले आहेत. तेथील लोककलेचा अभ्यास केला आहे. 'Indian Traditional Theatre' आणि 'Songs of Asia' या दोन विषयांवर त्यांनी प्रबंधवाचन केले आहे. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'लोकनाट्याबद्दल पांढरपेशा मनात गैरसमज आहेत. वेडीवाकडी नाचणारी बाई म्हणजे लोकनाट्य; परंतु वास्तविक तसे नाही. लोकसंस्कृतीतून जन्माला आलं ते लोकनाट्य. प्रथम भाषा निर्माण होते. नंतर तिचे व्याकरण निर्माण होते. तसे प्रथम लोकनाट्य नंतर प्रगत नाट्य निर्माण होते. सहजता हा लोकसंगीताचा गाभा आहे. लोकसंगीत ही शास्त्रीय संगीताची जननी आहे. कित्येक लावण्यांनी नाट्यगीताला जन्म दिला आहे किंवा कित्येक नाट्यगीतांच्या चाली लावण्यांवरून घेतल्या आहेत. पूर्वीच्या अंगणात येणारा बहुरूपी, धनगरगीत, कीर्तन हे सारे लोकनाट्याचेच प्रकार होत.' श्री. अच्युत ठाकूर, श्री. विठ्ठल उमप यांनी प्रात्यक्षिक म्हणून काही पदे गाऊन दाखविली. त्यास श्री. प्रमोद परकर यांनी तबल्याची साथ केली होती.

१३ फेब्रुवारी. बोलणाऱ्या डॉ. वासंती रानडे, यांचा व्याख्यानाचा विषय होता, 'संगीत नाटकाची वाटचाल' डॉ. वासंती रानडे यांनी 'मराठी नाट्यसंगीतातील स्थित्यंतरे' या विषयावर प्रबंधलेखन करून Phdही पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले, 'मराठी माणसाच्या सांस्कृतिक मनाशी एकरूप झालेला नाट्यसंगीत हा संगीतप्रकार आहे. ख्याल, टप्पा, ठुमरी, तराणा हे जसे संगीताचे वेगळे प्रकार आहेत त्या अर्थाने नाट्यसंगीत हा वेगळा प्रकार नाही. नाट्यसंगीत यापैकी कोणत्याही प्रकारात गायले जाऊ शकते. लोकनाट्यसंगीत ही अभिजात नाट्यसंगीताची प्रेरणा होती. वेद, रामायण, महाभारत यामध्ये नाट्य होते. त्या नाट्याला संगीताची जोडही होती; पण त्याचे स्वरूप आज आपल्याला माहिती नाही. भरतापासूनच्या संहिता उपलब्ध आहेत. त्यावरून आपण काही अंदाज करू शकतो. भरताच्या आधीच्या काळात नाटकसंगीताच्या दोन परंपरा दिसतात. उपरूपक या नाट्यप्रकारात लोकसंगीत होते. दशरूपनाटक या प्रकारात अभिजात संगीत होते. भरताच्या काळातले नाट्यसंगीत म्हणजे स्वरांच्या रूपाचे चित्र होते, त्या नाट्यसंगीताला निश्चित नियम होते. शिस्त होती. जेव्हा संगीत नाटकाचा ऱ्हास झाला तेव्हा उपरूपकाची संगीत रंगभूमी सुरू झाली. दशावतार, ललित, भारूड, गोंधळी हे सारे संगीत नाटकाचे प्रकार उपरूपकात येतात. विष्णुदास भावे यांच्या नाटकातील संगीतात या उपरूपकाच्या प्रेरणा दिसतात. विष्णुदास भावे गायन शिकलेले होते. त्याचा कर्नाटकी संगीताचा अभ्यास होता. मिश्र रागातल्या लावण्यांच्या चाली त्यांनी आपल्या नाटकातील पदांना दिल्या होत्या. भाव्यांच्याच चाली पुढे किर्लोस्करांच्या नाटकात संक्रमित झाल्या, किर्लोस्करी नाटकात लावणीच्या चाली फार थोड्या होत्या. त्यांच्या नाट्यसंगीतात दादरा, ठुमरी हे परप्रांतीय प्रकार वापरले गेले. त्यांना फडाच्या लावणीतील गिरकीच्या तालाची जोड दिली गेली म्हणून त्यात लावणीची लज्जत आहे, पण ते लावणीमय आहे असा शिक्कामोर्तब करण्याइतके लावणीचे वजन त्यावर नाही. पाटणकरांनी नाट्यगीताला उडत्या चाली दिल्या. भाऊराव कोल्हटकरांनी आपल्या पदासाठी उर्दू, फारशी चाली वापरल्या. मंजीखाँनी भावगीतगायनाला सुरुवात केली. त्याचा परिणाम नाट्यसंगीतावर झाला. त्यातून एकोणीसशेसत्तावन्ननंतर 'पंडितराव जगन्नाथ' सारख्या नाटकात साचेबंद भावगीते आली. नाट्यसंगीतावर विशिष्ट शिक्कामोर्तब करता येत नाही. त्याची भूमिका समन्वयवादी आहे. त्यात विशिष्ट घराण्याची तालीम आहे. शिवाय इतर अनेक गोष्टी आहेत. कोणताही स्वर जो वातावरणनिर्मिती करतो त्याला नाट्यसंगीत म्हणावे. 'घाशीराम कोतवाल'मधील गात गात झुलणारी ब्राह्मणांची भिंत किंवा 'लेकुरे उदंड झाली' मधले संगीतमय संवाद हेही नाट्यगीतच. कटाव, पोवाडा याचाही नाट्यसंगीतात समावेश करायला हरकत नाही.' डॉ. वासंती रानडे यांनी आपले विवरण करताना वेळोवेळी गायनाची प्रात्यक्षिके दाखवून आपल्या मुद्द्यांचे स्पष्टीकरण केले.

रंगभूमीविषयी विचारांना उपयुक्त चालना देण्याचे काम या भाषणांनी केले.

**–विनया खडपेकर**

# मोलकरणींच्या संपाच्या निमित्ताने : पृष्ठ १ वरून

अलीकडे स्टीलच्या भाड्याचा वापर वाढला आहे. कपड्यासाठी वेगवेगळ्या साबण–पावडरी बाजारात येत आहेत. या पावडरीच्या वापराने घरमालकीणीची काटकसर होत असते; पण मोलकरणीच्या हातांच्या मात्र जाळ्या होत असतात. या पावडरमुळे पायाची साल निघते. सतत पाण्यातच काम करायचे असल्याने पायाला चिखल्या असतातच ! हाताची साले या पावडरींनी निघत असल्याने मिरची, तिखट, मसाला, मीठ हाताला लागले की आग ठरलेली आहे. खरकटी भांडी घासताना अशी आग होत असली तरी पोटाची आग विझविण्यासाठी ही आग सहन करणे भाग असते. या संदर्भात साबण आणि भांडी घासण्याच्या पावडरची परीक्षा, त्याचा शरिरावर काय परिणाम होतो हा मुद्दा लक्षात घेऊन करणे आवश्यक आहे.

संपाला आणि पगारवाढीला विरोध करताना आम्ही आमच्या मोलकरणीशी माणूस म्हणून वागतो, मग पगार कशाला वाढवयाचे असे म्हणाऱ्यांनी वरील प्रश्नाचा जरूर विचार करावा.

## विरोध, उदासीनता, सहानुभूती

संप सुरू झाल्यानंतर सामाजिक विरोध फार मोठ्या प्रमाणावर व्यक्त झाला. मोलकरणीच्या एका मोर्चाला पोलिस इन्स्पेक्टरने अडवून मोर्चाला परवानगी आहे का असे विचारले. वास्तविक त्या भागात १४४ कलम नव्हते. सर्व श्रमिक संघाच्या कार्यकर्त्याने कमिशनरला फोन करून विचारता परवानगी काढली नाही तरी चालते असे उत्तर दिले. यावरून इन्स्पेक्टरमधला घरमालक किती जागा होता ते पहा !

याहीपेक्षा बहादुरी काही घरमालकीणींनी दाखवली. बाया संपाचा प्रचार करीत हिंडत होत्या. ज्या बाया दडपणाखाली कामावर जात होत्या त्याना समजावून देण्याचे काम चालू होते. एखादी कामावर जाण्याने संप फुटण्याची भीती असते. त्यामुळे संप फोडून आमच्या पोटावर पाय आणू नको म्हणून बोलाचाली होत होती. काही बायाना अडविले जात होते. एक दोन घरमालकीणींनी लगेच पोलिसाकडे धाव घेतली. कारण काय तर आमच्या मोलकरणीला म्हणे मारले जात आहे ! इतर वेळेला मोलकरणीच्या अन्य प्रश्नांचा विचार केला जात नाही आताच तिच्या सुरक्षितेची आठवण का येते ? मध्यमवर्गातल्या सुशिक्षित बायकांनी तर या संपात अफवा पसरवण्यात फार पुढाकार घेतला होता. मोलकरणीना दहशत बसविण्यासाठी 'बायांना तुरुंगात टाकले !' येथपासून ते 'लकडीपूल चौकात मोलकरणीमध्ये तुबळ मारामारी झाली,' येथपर्यंत अफवा पसरल्या गेल्या संपाचा आढावा घेण्यासाठी दररोज रात्री मिटिंगस् होत तिथं बायानी या अफवा सांगितल्या !

या संपाला मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीयाची सहानुभूती नव्हतीच. त्यांनी अतिशय कटु प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. यामध्ये बँक ऑफिसर, प्राध्यापिका, क्लार्क, शिक्षिका इ. आहेत. मध्यमवर्गाच्या सामाजिक उदासीनतेचे प्रतिबिंब त्यात आढळून येतं. नोकरी करणाऱ्या काही स्त्रियांनी पगारवाढ लगेच केली आणि सुट्टीच्या मागण्यांचं स्वागत करून सुट्ट्या ठरवूनही टाकल्या; पण अशा स्त्रिया अतिशय कमीच. बऱ्याचजणींचं म्हणणं, 'पगार का वाढवायचे ? नाही तरी आम्ही एक कप चहा देतो, सणावाराचं वाढणं देतो, शिळंपाकं देतो, राहिलेलं अन्न देतो, आज किती महागाई आहे. चहाच्या कपाला चाळीस पैसे पडतात बाहेर ! आणि जरी पगारवाढ दिली तरी दारूतच पैसे जाणार ना ?' तरुण अविवाहित मोलकरणीबद्दल 'या शेवटी सिनेमातच पैसे घालवणार ना ?'

काही मालकिणी खरोखरच एक माणूस, घरच्यासारखा म्हणून मोलकरणीला चहा देतात; पण बाकी ठिकाणी चहा का दिला जातो ? साधारणपणे ८॥ ते ९ ही दुसऱ्या चहाची वेळ असते ! याच वेळेला स्वयंपाकाची गडबड असते. चहाचे पातेले आणि कपबशा चहा दिला की मोलकरीण धुतेच, या हिशोबाने तिला चहा दिला जातो. हा चहा फुकट नसतो, या बदल्यात काम करून घेतले जाते याची जाणीव मोलकरणीनाही असते. कित्येकदा स्वयंपाकाची घाई म्हणून किंवा आता गॅस बंद आहे, फक्त चहा गरम करण्यासाठी पेटवावा लागेल म्हणून, गार चहाच मोलकरणीला प्यावा लागतो. तिने प्यायला नाही तर ती 'माज आलेली' ठरते ! अशीच गोष्ट सणाच्या वाढण्याचीही !

सणाचं वाढणं काय पद्धतीनं दिलं जातं याचीही वर्णनं अनेक बायांनी ऐकवली. 'अळूची भाजी भज्यात पळती आणि भातावरचा वरणाचा ठिपका ओघळून बटाट्याच्या भाजीत येतो !' आणि सणाच्या दिवशी जादा भांडीही असतात. तेलकट भांडी असतात. ती घासायला जादा त्रास पडतोच. त्याचा जादा दर मोलकरीण लावत नाही. वाढण्याच्या मोबदल्यात ती ते काम करीत असते. म्हणजे आपण सणाचं वाढणं देतो म्हणजे बरंच काही करतो असेही मालकिणींनी समजू नये. शिवाय वर्षभरात पाहुणे, आलं-गेलं याच्या जादा कामाचे पैसे मोलकरणी घेत नाहीत याची नोंद मात्र नाही, मग मात्र, 'घर म्हटलं की आलं-गेलं येणारच !' असे म्हणून मालकिणी गप्प होतात !

अनेक मोलकरणीचे नवरे दारू पितात हे वास्तव आहे; पण म्हणून पगार नाकारावा हा कुठला न्याय ? मोलकरणीच्या कष्टातून मिळालेला पैसा तिने कुठे खर्च करावा हे सांगण्याचा मालकिणीला काय हक्क आहे ? उद्या एखाद्या शासनाने 'तुमच्या पगारापैकी बराच भाग तुम्ही व तुमची मुले सिगरेट, बियर, व्हिस्कीवर घालवता' म्हणून पगारकपात केली किंवा पगारवाढ नाकारली तर मूलभूत लोकशाही, मानवी अधिकार इ. घोषणा घेऊन हीच माणसे बंड करायला उठतील, लोकशाहीचा नारे गर्जवतील याची खात्री आहे. तिचा नवरा दारू पितो म्हणून पगारवाढ नाकारण्याचा काय अधिकार आहे ? किंवा ती सिनेमा पाहते म्हणून पगारवाढ द्यायची नाही हा कुठला न्याय ?' मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय स्त्रियाना, घरात T. V. फक्त शोभेसाठी हवा असतो ? चैन, करमणुकीचा मक्ता फक्त मध्यमवर्गाकडे नाही. मोलकरीण श्रम करीत असते. तिच्या

श्रमाची किंमत ठरवण्याचा तिला अधिकार आहे, हक्क आहे. महागाईची झळ काय फक्त मध्यमवर्गीयानाच पोहोचते ? या संपाचा संबंध प्रामुख्याने मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीयाशी होता. बँका असोत वा सरकारी कार्यालये असोत, वेगवेगळ्या आयोगाच्या शिफारशीसाठी ही मंडळी भांडत असतात, पगारवाढ मागत असतात. लाँड्रीत एक शर्ट टाकला तरी २ रु. जातात. घरातले सगळ्याचे कपडे जर लाँड्रीत टाकले तर महिन्याचा खर्च किती येईल याचा जर हिशोब केला तर मोलकरणीला किती स्वस्त दरात राबवून घेतले जाते याची कल्पना येईल. ५ रु. पगारवाढ करायला कुरकुर करणाऱ्यांनी याचा विचार जरूर करावा.

आज शहरी भागाला रोजगार हमी योजना लागू केलेली नाही. त्यामुळे अशा अत्यंत अपुऱ्या पगारावर या स्त्रिया काम करीत आहेत. अशा योजना शहरी भागाला लागू झाल्यास स्त्रियांपैकी बऱ्याच जणी या योजनेकडे जातील आणि घरकामावरील खर्च पुन्हा वाढेल याची नोंद घरमालकिणींनी घ्यायला हवी. कमी पगारावर, वेतनावर या स्त्रियांचे शोषण चालू आहे या स्त्रियांसाठी कोणतेही कायदे नाहीत. भारतामध्ये बालकामगार आणि स्त्री कामगारांपैकी बराच मोठा विभाग घरकामामध्ये गुंतलेला आहे. किमान वेतनासारखा एखादा कायदा या घरकामक्षेत्राला येण्याची अत्यंत गरज आहे पुण्यामधल्या बायांनी उत्स्फूर्त संपाने प्रारंभ करून संघटना बांधण्याच्या प्रयत्नाला सुरुवात केली आहे ती याच हेतूने. ज्या तऱ्हेने संप त्वरित पसरला यावरून त्यांच्या मागण्या तीव्र आहेतच; पण भविष्यकाळाचा वेध घेऊन त्या पूर्ततेच्या तयारीने त्या या संपात उतरल्या आहेत हे निश्चित.

मोलकरणींचा संप काही ठिकाणी अद्याप चालू आहे. खाली मान घालून भांडी घासणाऱ्या बायांनी तो जिद्दीने लढवला आहे. यापूर्वी कधीही रस्त्यावर न आलेल्या या स्त्रिया रस्त्यावर आल्या आहेत. एका बाजूनं मोलकरीण म्हणून त्या रस्त्यावर उतरल्या आहेत; पण दुसऱ्या बाजूनं महागाईची, टंचाईची झळ लागलेल्या जनतेचा हा एक विभाग मोलकरणीच्या रूपानं रस्त्यावर उतरला आहे. संपामुळं ५ रु. पगारवाढ, हक्काच्या दोन सुट्या मिळाल्या आहेत. दडपलेले लोक आता स्वतःच्या हक्काच्या मागण्या करीत पुढे येत आहेत. ते गप्प बसून राहणार नाहीत हेच या मोलकरणींच्या संपानं सिद्ध केलं आहे.

रता भिसे । लीला भोसले<br>पुणे

# निवासी डॉक्टर्स 'शोषक' कसे ?

दि. ८ फेब्रुवारी १९८० पासून महाराष्ट्रातील विविध सरकारी आणि महानगरपालिकेच्या रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचा वेतनवाढीसाठी बेमुदत संप सुरू झाला आज आपल्या हातात जेव्हा हा अंक पडेल तेव्हा या संपाला कदाचित पधरवडाही पुरा झाला असेल. संपावरील निवासी डॉक्टराचा एक प्रतिनिधी या नात्याने मी बऱ्याच पत्रकारांशी बातचीत केली. इतरही काही मंडळीशी बोलण्याचा योग आला या सगळ्यामधून मला काही ठराविक गोष्टी प्रामुख्याने आढळल्या. डॉक्टरांच्या एकूण व्यवसायाविषयी काही अगदी बांधून घेतलेले सिद्धांत, समज–गैरसमज यामुळे बऱ्याच मंडळींना डॉक्टरांच्या या मागण्यांमधील वैधता समजावून घेणे कठीण जात होते. त्यातून डॉक्टर हा व्यवसायत.च समाजसेवक असतो. रुग्णसेवा ही एक अत्यावश्यक सेवा आहे आणि त्यातून एक डॉक्टर निर्माण करताना समाज त्यावर एक लाख रुपये खर्च करीत असतो. तेव्हा अशा परिस्थितीत 'केवळ' वेतनवाढीसाठी संपावर जाणे हे डॉक्टराना कितपत सयुक्तिक दिसते, यासारखे प्रतिप्रश्न या चर्चांमधून मला वारंवार विचारले गेले. या प्रश्नांचाच थोडा अधिक विचार मी या लेखात करणार आहे

संपावरील निवासी डॉक्टरांची प्रमुख मागणी अर्थातच वेतनवाढ ही आहे सध्या निवासी डॉक्टरांना त्यांच्या तीन वर्षांच्या मुदतीत रु. ५०१ ते ६६१ असे विद्यावेतन मिळते. त्यात वाढ करून ते रु. ९०० ते १२०० असे व्हावे अशी ही मागणी आहे सध्या चालू असलेले हे वेतनमान १९७३ साली निश्चित केले होते. त्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार त्यामध्ये प्रचलित भावनिर्देशांकाप्रमाणे वेळोवेळी वाढ केली जाणे अपेक्षित होते; पण हे कधीच घडले नाही. महागाई बेसुमार वाढली. विशेषतः वैद्यकीय पुस्तकाच्या किंमती मधल्या काळात तिपटी-चौपटीने वाढल्या. परंतु निवासी डॉक्टरांच्या वेतनाबाबत मात्र सरकार पूर्णतया उदासीन राहिले. वेळोवेळी सरकारदरबारी अर्जविनंत्या करण्यात आल्या, शिष्टमंडळे पाठविण्यात आली; परंतु त्याची दखल घेतली न गेल्यानेच अखेर एक दिवसाच्या लाक्षणिक संपानंतर बेमुदत संपाचा हा मार्ग स्वीकारावा लागला. अगदी सरळ दृष्टीने विचार केल्यास वेतनवाढीच्या या मागणीबाबत कुणाचेही दुमत होण्याचे कारण नाही; परंतु तरीही कित्येक मंडळी डॉक्टरांच्या या मागणीविषयी उदासीन दिसतात. डॉक्टर्स व वैद्यकीय व्यवसाय याविषयीच्या अनेक गैरसमजामधून हे औदासीन्य निर्माण झाले आहे असे मला वाटते.

## गैरसमजच अनेक !

बहुसंख्य मंडळींना डॉक्टरांच्या, विशेषतः निवासी डॉक्टरांच्या कामाच्या स्वरूपाची काहीच कल्पना नसते. ही डॉक्टरमंडळी पांढरे डगले घालून सकाळी वॉर्डातून हिंडतात, वरिष्ठ डॉक्टर्स सांगतील ती 'ट्रीटमेंट' लिहितात, पेशंट्स्‌शी तुसडेपणाने वागतात आणि बिचाऱ्या गरीब रुग्णावर प्रयोग करून शिकतात. निवासी डॉक्टरांच्या कार्याविषयी काहीची कल्पना अशी असलेली मला आढळली

परंतु वस्तुस्थिती याहून पूर्णपणे वेगळी आहे निवासी डॉक्टर हा त्याच्या आवडीच्या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेणारा, एक जबाबदार आणि हुषार विद्यार्थी असतो. त्याच्या या शिक्षणाच्या तीन वर्षांच्या काळात वॉर्डातील त्यांच्या अखत्यारीतील सर्व रुग्णांची सर्व जबाबदारी त्याच्यावर असते. या रुग्णाची उपाययोजना तो मुख्यत्वे स्वतःच्या जबाबदारीवर व प्रसंगी तज्ज्ञांच्या योग्य मार्गदर्शनाखाली करीत असतो आपल्या या कामाशी तो दिवसाचे २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस बांधलेला असतो. तीन वर्षांच्या या

काळात त्याला एकही सुटी मिळत नाही. सुटीच्या काळातदेखील त्याला आपल्या कामासाठी पर्यायी व्यवस्था करावीच लागते. या तीन वर्षांच्या काळात निवासी डॉक्टरचे आयुष्य हे एक प्रकारे रुग्णांच्या आयुष्याशी पूर्णतया बांधलेले असते. डॉक्टराच्या जीवनाविषयी सर्वसामान्याच्या मनात जी एकूण रोमांचकारी कल्पना असते, त्याहून अगदी विसंगत अशी ही वस्तुस्थिती आहे. सरकारी नोकरीत काम करणाऱ्या किती नोकराना अशा प्रकारच्या बांधिलकीमध्ये काम करावे लागते, याचा विचार करून पहाण्याजोगा आहे. दिवसाचे केवळ आठ तास, आठवड्यातून पाच ते सहा दिवस काम आणि इतर शासकीय सुट्ट्या एवढ्या कामासाठी आज शासन एम्. बी. बी. एस्. पर्यंत शिकलेल्या लेक्चररना १४५० रु. वेतन देते; परंतु निवासी डॉक्टराना केवळ ५०० रु. वरच समाधान मानावे लागते. निवासी डॉक्टराना मिळते ते विद्यावेतन असे म्हणून ही समस्या सुटत नाही. कारण निवासी डॉक्टर हा विद्यार्थी असला तरी सरकारी नोकराएवढ्याच जबाबदाऱ्या त्याला उचलाव्या लागतात. आज सर्व सरकारी इस्पितळे याच डॉक्टरांच्या कामामुळे चालतात. ही वस्तुस्थिती या संपातून पूर्णपणे स्पष्ट झालेली आहे.

### अनिश्चित भविष्यकाळ !

सर्वच डॉक्टर विशेषतः उच्च शिक्षण घेणारे डॉक्टर हे अखेर शोषकवर्गाचे प्रतिनिधी असतात, हीसुद्धा अशीच एक समजूत. आज केवळ ५०० रु. वर काम करणारे हे डॉक्टर उद्या खोऱ्याने पैसे ओढतील, रुग्णांना नागवतील ही बऱ्याच जणांची कल्पना आहे. काही तथाकथित समाजसेवक डॉक्टरमंडळीनीही या गैरसमजाला खतपाणी घालण्यास मदत केली आहे. पण हीही काही पुरेपूर वस्तुस्थिती नाही. आज डॉक्टराचा, विशेषतः उच्चशिक्षित डॉक्टरांचा भविष्यकाळ लोकांना वाटतो तसा उज्ज्वल राहिलेला नाही. वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत केवळ शिक्षण घेत राहाणे, त्यानंतर भरपूर भांडवल गुतवून अनिश्चित काळपर्यंत वाट पाहात राहाणे हे डॉक्टरचे चित्र कितपत आशादायक आहे? एवढ्या काळापर्यंत आर्थिक ओढाताण सहन करण्यास सर्वच डॉक्टर्स आर्थिकदृष्ट्या बळकट असतात हीही कल्पना चुकीची आहे. मध्यमवर्गातून येणारेही बहुसंख्य डॉक्टर्स असतात आणि त्यांनाही या अनिश्चित भविष्यकाळास तोंड द्यावे लागते.

आज उच्च शिक्षण घेणारे डॉक्टर उद्या शोषक बनतील या भीतीने डॉक्टरांना त्यांच्या कामाचा रास्त मोबदलाच देण्यास नकार देणे चूक आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या सर्वच डॉक्टरावर यातून अन्याय होतो.

आणि अखेर डॉक्टर्स शोषक का बनतात याचाही विचार करणे जरूर आहे वैद्यकीय अभ्यासक्रम खूप लाबलचक आहे. वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत आज डॉक्टर शिकतच असतो. अखेर तिसाव्या वर्षी जेव्हा त्याचे शिक्षण पूर्ण होते तेव्हा तो आर्थिकदृष्ट्या पूर्ण कंगाल असतो. उलट त्याला कर्ज काढूनच पुढील व्यवसायाला लागावे लागते. या काळात जर अखेर झटपट पैसा मिळविण्याकडे त्याचा कल झुकला, तर तो फक्त त्याचाच दोष धरता येईल का? वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत त्याच्याकडून भरपूर समाजोपयोगी काम करून त्याला कफल्लक ठेवणाऱ्या शिक्षणक्रमाचाही हा अपरिहार्य शेवट आहे.

या निवासी डॉक्टरांना प्रथमपासूनच योग्य तो मोबदला देऊन त्याना आयुष्यात योग्य ते स्थैर्य देऊन 'शोषक' डॉक्टर बनविण्याच्या प्रक्रियेला थोडी तरी खीळ बसविणे, समाजाच्या दृष्टीनेही हिताचे नाही का?

डॉ. संजीव व्यं. मंगरूळकर

---


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार..



कुशल लेखक, कुशल कुंभाराने मातीला
आकार द्यावा तसा शब्दांना आकार देतो.
त्यांना प्रवाही बनवतो.
कुशल लेखकाप्रमाणे चतुर माणूस आपल्या
आयुष्याला नव्हे तर आपल्या मुलाबाळांच्या
आयुष्यालाही आकार देतो.....
त्यासाठी पैशाची बचत हवी, योग्य
गुंतवणूक हवी, पैशाची वाढ हवी.....
आमच्या सगळ्याच योजना यासाठी
आदर्श आहेत.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कार्यालय: लोकमंगल, पुणे ४११००५.

बँकिंग सेवा

व्यक्तिगत जिव्हाळा

पद्मजा